दैनिक
# लोकविजय
संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

## तुकाराम मुंढे यांची परभणी पालक सचिवपदावरील जबाबदारी काढली

मुंबई दि.२३ (प्रतिनिधी)- अन्न व औषध प्रशासनाच्या आयुक्तपदाचा पदभार स्वीकारल्यापासून धडाडीची कामगिरी करणाऱ्या तुकाराम मुंढे यांच्यासंबंधी एक मोठी माहिती समोर आली आहे. त्यांच्याकडे असलेल्या परभणीच्या पालक सचिवपदाच्या जबाबदारीतून मुक्त करण्यात आलं आहे. त्यांच्याऐवजी डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांच्याकडे आता परभणीच्या पालक सचिवपदाची जबाबदारी देण्यात आली आहे. दिव्यांग कल्याण विभागाचे प्रधान सचिव असताना, २३ फेब्रुवारी २०२६ रोजी तुकाराम मुंढे यांच्याकडे परभणीच्या पालक सचिवपदाची जबाबदारी देण्यात होती.

एफडीएचे आयुक्त तुकाराम मुंढे हे या आधी मंत्रालयात सचिव असताना त्यांच्याकडे परभणी जिल्ह्याच्या पालक सचिवपदाची जबाबदारी देण्यात आली होती. आता तुकाराम मुंढे हे सचिव नाहीत. त्यामुळे त्यांच्याकडे असलेली पालक सचिवपदाची जबाबदारी आता दुसऱ्या अधिकाऱ्याकडे सोपवण्यात आली आहे. डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांच्याकडे आता परभणीच्या पालक सचिवपदाची जबाबदारी असेल. डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार हे सध्या राज्याच्या ग्रामविकास व पंचायत राज विभागाचे सचिव आहेत.

(वर्ष ६५ वे अंक १६२) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) बुधवार, दि.२४ जून २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)

## प्रत्येक पोलीस ठाण्यात अमली पदार्थविरोधी कार्यवाहीसाठी स्वतंत्र युनिट उभारणार-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### विज कंपन्यांना निकृष्ट कोळसा पुरवणाऱ्या कंपन्यांच्या विरुद्ध वडेट्टीवार आक्रमक

मुंबई दि.२३ (प्रतिनिधी)- राज्यातील अमली पदार्थांची विक्री, तस्करी आणि सेवन रोखण्यासाठी राज्य शासनाकडून व्यापक मोहीम राबविण्यात येत आहे. अमली पदार्थ व्यापार व सेवनाचे समूळ उच्चाटन करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यातील पोलीस ठाण्यात अमली पदार्थविरोधी कार्यवाहीसाठी स्वतंत्र युनिट उभारण्यात येणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत दिली. राज्यातील अमली पदार्थ विक्री व सेवनासंदर्भात सदस्य सुनील प्रभू यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी सदस्य सुधीर मुनगंटीवार, जयंत पाटील, अमीन पटेल, योगेश सागर आणि संजय क्षीरसागर यांनी उपप्रश्न उपस्थित केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, अमली पदार्थांचे उत्पादन, तस्करी आणि सेवन हे केवळ महाराष्ट्रासमोरील नव्हे तर संपूर्ण देशासमोरील गंभीर आव्हान आहे. केंद्र शासनाने देशव्यापी अमली पदार्थविरोधी मोहीम हाती घेतली असून त्याअंतर्गत राज्य शासनाने ‘व्होल ऑफ गव्हमेंट ॲपरोच ’ विकसित केला आहे. गृह विभागाच्या माध्यमातून विविध विभागांमध्ये समन्वय साधून अवैध अमली पदार्थांची शेती, लागवड, उत्पादन, व्यापार, वाहतूक, विक्री आणि सेवन यांवर नियंत्रण आणण्यासाठी व्यापक उपाययोजना राबविण्यात येत आहेत.

अमली पदार्थांच्या प्रसाराला आळा घालण्यासाठी राज्यभर जनजागृती मोहीम राबविण्यात येत असून ‘ड्रग्ज फ्री मुंबई’ अभियानाद्वारेही जनजागृती करण्यात येत आहे. तसेच अमली पदार्थ आणि मनःप्रभावी पदार्थ कायद्यात सुधारणा करण्याबाबत केंद्र शासनाला राज्य शासनाने सूचना पाठविल्या असल्याची माहितीही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली.

राज्य शासनाच्या ‘झिरो टॉलरन्स’ धोरणानुसार कायद्यांतर्गत दोषी आढळणाऱ्या पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना सेवेतून बडतर्फ करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. दुसरीकडे, अमली पदार्थविरोधी कारवाईत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना बढती, प्रोत्साहनपर लाभ आणि विशेष नियुक्ती देण्यात येणार आहे. अमली पदार्थविरोधी टास्क फोर्समध्ये तीन वर्षे



सेवा पूर्ण केल्यानंतर इच्छेनुसार बदलीची सुविधाही उपलब्ध करून दिली जाणार आहे. मुंबई पोलिसांनी गुजरात, तेलंगणा, उत्तर प्रदेशसह विविध राज्यांत जाऊन यशस्वी कारवाया केल्या आहेत. २०२५ मध्ये अमली पदार्थविरोधी टास्क फोर्स आणि पोलीस यंत्रणेमार्फत तब्बल ५२३.१७ कोटी रुपयांचे अमली पदार्थ नष्ट करण्यात आले.

जानेवारी ते एप्रिल २०२६ या कालावधीत अमली पदार्थ बाळगल्याप्रकरणी १,१४२ गुन्हे दाखल करण्यात आले असून १,६२६ आरोपींना अटक करण्यात आली आहे. या कारवाईत २५४.५३ कोटी रुपयांचे अमली पदार्थ जप्त करण्यात आले. तसेच अमली पदार्थ सेवनाविरोधात ३,१९९ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

मे २०२६ अखेर अमली पदार्थ विक्री करणाऱ्यांविरोधात ५२८ गुन्हे दाखल करून ६५५ आरोपींना अटक करण्यात आली आहे. तसेच सेवन करणाऱ्या २,८५५ जणांविरोधात गुन्हे दाखल करून २,४५९ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

विधानसभेत आज वीज निर्मिती आणि वीज टंचाईच्या मुद्द्यावरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये जोरदार खडाजंगी पाहायला मिळाली. राज्यातील वीज निर्मिती केंद्रांतील संच वारंवार बंद पडण्यामागे निकृष्ट दर्जाचा कोळसा हेच प्रमुख कारण आहे,“ असा थेट आरोप काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी तारांकित प्रश्नादरम्यान केला. विशेष म्हणजे, विरोधी पक्षाचा हा आरोप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही सभागृहात मान्य केला असून, राज्याला मिळणाऱ्या कोळशाच्या निकृष्ट दर्जामुळे वीज निर्मितीवर काही अंशी परिणाम होत असल्याची कबुली मुख्यमंत्र्यांनी दिली.

विजय वडेट्टीवार यांनी सभागृहात आक्रमक पवित्रा घेत, महाजनिर्मितीला निकृष्ट (पान ४ वर)

## राज्य सरकारची कर्जमाफी फसवी

### अंबादास दानवे यांचा विधान परिषदेत गंभीर आरोप

मुंबई दि.२३ (प्रतिनिधी)- राज्य सरकारने जाहीर केलेली पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना - २०२६ ही प्रत्यक्षात शेतकऱ्यांसाठी कर्जमाफी नसून कर्जवसुली योजना आहे. या योजनेतील अटी-शर्ती पाहता शेतकऱ्यांना त्याचा किती फायदा होणार याबाबत मोठी शंका आहे, असा गंभीर आरोप शिवसेना नेते तथा राज्याचे माजी विधान परिषद विरोधी पक्षनेते, आमदार अंबादास दानवे यांनी मंगळवारी केला. यावेळी त्यांनी जलसंधारण खाते मोहित कंबोज चालवतात. ते सत्ताधाऱ्यांचे कोण लागतात, असा सवालही केला. त्यामुळे विरोधक आणि सत्ताधाऱ्यांमध्ये खडाजंगी झाली.

महाराष्ट्र विधान परिषदेत नियम २६० अन्वये झालेल्या चर्चेत बोलताना दानवे यांनी सत्ताधारी पक्षाने मांडलेल्या प्रस्तावाला जोरदार विरोध केला. “लबाडाच्या घरची खीर कधी खायला मिळेल याची खात्री नसते, तशीच राज्य सरकारच्या आश्वासनांची अवस्था आहे,“ असा टोला दानवे यांनी राज्य सरकारला लगावला.



जलसंधारण, जलसंपदाचे खाते मोहित कंबोज चालवतात. विभागातले अधिकारी मोहित कंबोज यांना फोन करा म्हणतात. मोहित कंबोज सत्ताधाऱ्यांचे कोण लागतो, असा सवाल अंबादास दानवे यांनी विधान परिषदेत केला. त्यामुळे सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये खडाजंगी झालेली पाहायला मिळाली.

उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील महाविकास आघाडी सरकारने २०१९ मध्ये केलेली कर्जमाफी कोणत्याही अटींशिवाय आणि थेट शेतकऱ्यांच्या खात्यात पोहोचली होती. मात्र सध्याच्या योजनेत तब्बल १७ अटी-शर्ती लावण्यात आल्या असून अनेक शेतकरी या कर्जमाफीच्या कक्षेबाहेर राहणार असल्याचा दावा अंबादास दानवे यांनी केला.

राज्य सरकारने नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना देण्यात येणारे ५० हजार रुपयांचे प्रोत्साहन अनुदान अद्याप पूर्णपणे दिले नाही. २०१७ आणि २०१९ च्या कर्जमाफीतील सुमारे ६ हजार कोटी रुपये अजूनही थकीत आहेत. मात्र त्यासाठी सरकारने केवळ २०० कोटी रुपयांचीच तरतूद केली असल्याचे दानवे यांनी सांगितले..

गेल्या ११ वर्षांत उद्योगपतींची १६.३५ लाख कोटी रुपयांची कर्जे माफ करण्यात आली, तर शेतकऱ्यांना केवळ १.६६ लाख कोटी रुपयांची मदत मिळाल्याचा दावा करत अंबादास दानवे यांनी सरकारवर टीका केली. ठिबक आणि तुषार सिंचन अनुदान, पीक विमा, डीबीटी प्रणाली, बळीराजा पाणंद रस्ते, नुकसानभरपाई आणि जलसंधारणाच्या योजनामध्ये मोठ्या प्रमाणावर त्रुटी निर्माण झाल्या आहे. मराठवाडा वॉटर ग्रीड योजना सपशेल अपयशी ठरल्याचा आरोप करत मराठवाड्याला हक्काचे पाणी मिळाले नसल्याचे दानवे यांनी नमूद केले.

## अधिकाऱ्यांना झाडाला बांधा आणि वाघ सोडा, मानव-वन्यजीव संघर्षावरून मुनगंटीवारांचा संताप

नागपूर दि.२३ (प्रतिनिधी)- मानव-वन्यजीव संघर्षाच्या प्रश्नावरून भाजप आमदार तथा माजी वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी मंगळवारी विधानसभेत प्रशासनावर जोरदार टीका केली. वाघाच्या हल्ल्यातील पीडितांना वेळेवर निधी न देता त्यांना मंत्रालातील अधिकारी ताटकाळत ठेवतात. अशा अधिकाऱ्यांना एक दिवसाचा कायदा करून झाडाला बांधा आणि वाघ सोडा, म्हणजे त्यांना या संघर्षातील पीडितांची व्यथा कळेल.

वाघाच्या हल्ल्यातील पीडितांना वेळेवर निधी न देता त्यांना ताटकाळत ठेवणाऱ्या अधिकाऱ्यांवर निशाणा साधतांना त्यांनी आदित्य ठाकरे यांचे लक्ष वेधले. सुधीर मुनगंटीवार म्हणाले, आदित्यजी या अधिकाऱ्यांना सरळ करण्यासाठी आम्हाला तुमच्याच नेत्यांची भाषा वापरावी लागते. संजय राऊत यांच्या शब्दकोषातील भाषा ऐकवल्याशिवाय हे अधिकारी ऐकत नाहीत. त्यामुळे त्यांना वठणीवर आणायचे असेल तर राऊतांच्या शब्दकोषातील भाषा वापरण्याशिवाय आम्हाला पर्याय नसतो.

वाघाच्या हल्ल्यातील पीडितांना वेळेवर मदत न देता फाईल रखडवणाऱ्या अधिकाऱ्यांवर माजी वनमंत्री सुधीर मुनगंटीवार प्रचंड संतापले. जोपर्यंत असा कामचुकारपणा करणाऱ्या अधिकाऱ्यांना झाडाला बांधत नाही, तोपर्यंत त्यांना परिस्थितीचे गांभीर्य कळणार नाही, असा आक्रमक इशारा त्यांनी दिला. राज्यातला मानव-वन्यजीव संघर्ष तीव्र झाला आहे, पण मुंबईत मंत्रालयात फाईल्स घेऊन बसणाऱ्या अधिकाऱ्यांना याचे गांभीर्य जाणवत नाही. वाघाच्या हल्ल्यातील पिडीतांना वेळेवर निधी न देता हे अधिकारी मुंबईत मंत्रालयात बसून फाईल्स घेऊन बसतात असे मुनगंटीवार म्हणाले.

## महाराष्ट्रातही समान नागरी कायदा लागू होणार!, मसुदा तयार करण्यासाठी समिती गठीत; गृहराज्यमंत्री कदम यांची माहिती

मुंबई दि.२३ (प्रतिनिधी)- केंद्र सरकारपाठोपाठ आता महाराष्ट्र सरकारनेही समान नागरी कायद्याच्या दिशेने मोठी पावले टाकण्यास सुरुवात केली आहे. उत्तराखंड आणि इतर भाजपशासित राज्यांच्या धर्तीवर महाराष्ट्रातही समान नागरी कायदा लागू करण्यासाठी एका विशेष समितीची स्थापना करण्यात आली आहे, अशी महत्त्वपूर्ण माहिती राज्याचे गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी आज विधीमंडळ अधिवेशनात बोलताना दिली. या कायद्याचा मसुदा तयार करण्याचे काम लवकरच सुरू होणार असून, राज्य सरकार हा कायदा शंभर टक्के लागू करण्यासाठी कटिबद्ध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

यापूर्वी शिवसेना नेत्या नीलम गोऱ्हे यांनी देखील महाराष्ट्रात समान नागरी कायद्याच्या अंमलबजावणीचे संकेत दिले होते. त्यानंतर आता गृहराज्यमंत्र्यांनी दिलेल्या या अधिकृत माहितीमुळे राज्यातील राजकीय आणि सामाजिक वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.

गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी सांगितले की, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या कायद्याच्या अंमलबजावणीबाबत स्पष्ट आणि महत्त्वाच्या सूचना दिल्या आहेत. या कायद्याचा अंतिम मसुदा तयार करण्याची जबाबदारी निवृत्त न्यायाधीशांच्या एका विशेष समितीकडे सोपवण्यात आली आहे. समान नागरी कायदा लागू झाल्यानंतर समाजातील बहु लग्न पद्धती पूर्णपणे संपुष्टात येईल. या मुद्द्याचा मुख्य मसुद्यात प्राधान्याने समावेश केला जाणार आहे, जेणेकरून विवाह आणि कौटुंबिक कायद्यांमध्ये सर्वांना समान न्याय मिळेल.

नाशिकमध्ये नुकत्याच घडलेल्या एका धक्कादायक गुन्ह्याचा हवाला देत गृहराज्यमंत्र्यांनी या कायद्याची गरज अधोरेखित केली. नाशिकमध्ये मलिक अस्लम समशेर नावाच्या एका व्यक्तीने आपल्या पत्नीला फोन/ईमेलवरून तलाक दिल्याचे जाहीर केले आणि अवघ्या ८ दिवसांत त्या महिलेवर जीवघेणा हल्ला केला. या प्रकरणी पोलिसांनी तात्काळ गुन्हा दाखल करून आरोपीला बेड्या ठोकल्या आहेत.

या घटनेचा निषेध करत योगेश कदम कडक शब्दांत म्हणाले, “अशा प्रकारे केवळ एका फोन कॉलवर किंवा ईमेल पाठवून कोणालाही तलाक देता येणार नाही. अशा विकृत प्रवृत्तींना आळा घालण्यासाठीच राज्यात समान नागरी कायद्याची कडक अंमलबजावणी केली जाईल. महाराष्ट्रात आता कोणत्याही महिलेवर अन्याय होऊ दिला जाणार नाही, हाच या कायद्याचा मुख्य उद्देश आहे असे त्यांनी सांगितले.

## अपुऱ्या विकासनिधीचं तुणतुणं वाजवणाऱ्या फुटलेल्या खासदारांनी मंजूर निधीपैकी तुटपुंजा निधी वापरल्याचं उघड

मुंबई दि.२३ (प्रतिनिधी)- शिवसेना ठाकरे गटाच्या ६ बंडखोर खासदारांचा अखेर शिंदेंच्या शिवसेनेत काल (२२ जून) अधिकृत प्रवेश झाला. आम्ही जे करतो ते फुलप्रुफ करतो. त्यामुळे ऑपरेशन टायगर यशस्वी झाल्याची घोषणा यावेळी एकनाथ शिंदेंनी केली. विशेष म्हणजे ६ खासदार धनुष्यबाण चिन्हावर उभे राहतील आणि निवडूनही येतील अशी घोषणाही यावेळी एकनाथ शिंदेंनी केली. दरम्यान, शिवसेना शिंदे गटात प्रवेश करण्याचं कारण विचारल्यानंतर विकास निधी मिळत नाही. कामं होत नाहीत, अशी फुटीर खासदारांनी कारणं पुढे केली. परंतु फुटलेल्या खासदारांचा बुरखा टराटरा फाडणारी माहिती समोर आली आहे. विकास निधी मिळत नसल्याची तक्रार करणाऱ्या खासदारांनी विकास निधी मंजूर झाल्यानंतरही तो खर्च न केल्याचं समोर आलं आहे.

खासदार स्थानिक क्षेत्र विकास योजनेअंतर्गत प्रत्येक खासदाराला वर्षाला काही विशिष्ट कोटी रुपयांचा निधी मिळतो. हा निधी प्रामुख्याने रस्ते, सार्वजनिक आरोग्य, पिण्याचे पाणी, शिक्षण आणि स्वच्छता यांसारख्या कामांसाठी खर्च केला जातो. फुटलेल्या खासदारांपैकी काही खासदारांनी फुटण्याचं जे मुख्य कारण दिले आहे ते म्हणजे विरोधी पक्षातील खासदारांना विकास निधी मिळत नव्हता आणि त्यामुळे मतदारसंघातली कामे करण्यास अडचणी येत होत्या. मात्र प्रत्यक्षात खरंच विकास निधी मिळत नव्हता का? विकास निधी आतापर्यंत या खासदारांना किती मिळाला? आणि त्याचा वापर कसा केला?, संजय दिना पाटलांनी अवघा १.१ टक्के, वाकचौरेंनी ४ टक्के, तर ओमराजेंनी १८ पैकी फक्त २ कोटी खर्च केल्याची आकडेवारी समोर आली आहे.

## फेकनाथ मिंधे उत्तर द्यायला घाबरतात अन् पळून जातात, आदित्य ठाकरेंचा उपमुख्यमंत्र्यांवर थेट हल्ला

मुंबई दि.२३ (प्रतिनिधी)- राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनादरम्यान सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये जोरदार संघर्ष पाहायला मिळत आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे ज्याप्रमाणे आपल्या अखत्यारीत असलेले विभाग दुसऱ्या मंत्र्यांकडे सभागृहात उत्तर देण्यासाठी विभागून देतात, त्याप्रमाणे आता उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनीही आपले विभाग दुसऱ्या मंत्र्यांना उत्तरे देण्यासाठी दिले आहेत. सरकारच्या या भूमिकेला विरोधी पक्षातील नेते जयंत पाटील, विजय वडेट्टीवार आणि नाना पटोले यांनी तीव्र विरोध दर्शवला. या मुद्द्यावरून विरोधक प्रचंड आक्रमक झाले होते. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे ही सभागृहात उपस्थित होते. मात्र, सरकारने समाधानकारक उत्तर न दिल्याने अखेर या मुद्द्यावरून संतप्त झालेल्या विरोधकांनी सभागृहातून थेट सभात्याग करत कामकाजावर बहिष्कार टाकला.

सभागृहाबाहेर प्रसारमाध्यमांशी बोलताना आमदार आदित्य ठाकरे यांनी सरकारवर जोरदार प्रहार केला. आदित्य ठाकरे म्हणाले की, “आज आम्ही सभागृहावर बहिष्कार टाकला. एक नवीन प्रकार या सरकारच्या काळात सुरू झाला आहे. हे मिंधे स्वतःच्या खात्याचा अभ्यास करत नाहीत. उत्तर देता येत नाही म्हणून दुसऱ्या मंत्र्यांवर जबाबदारी देतात. हे झालं तरी मंत्री उत्तर देतात. फेकनाथ मिंधे उत्तर द्यायला घाबरतात आणि पळून जातात. आमच्या सरकारमध्ये कुठल्याही मंत्र्यांनी पळ काढला नाही की जबाबदारी दुसऱ्यावर ढकलली नाही. जी खाती रडून घेतली त्याबाबत उत्तर द्यायला हवी. अध्यक्ष हे खोटं बोलले ते रेकॉर्डवर गेलं आहे हे रेकॉर्ड वरून काढावं,“ असे त्यांनी म्हटले.

याच मुद्द्यावरून आमदार जितेंद्र आव्हाड यांनीही अध्यक्षांच्या कार्यपद्धतीवर आणि इंग्रजी शब्दांच्या वापरावर तीव्र आक्षेप नोंदवला. जितेंद्र आव्हाड म्हणाले की, “अध्यक्ष काहीही इंग्रजी शब्द वापरून आम्हाला मूर्ख समजतात. आम्हीही चांगल्या शाळेत शिकलो आहोत. आम्हाला इंग्रजी कळतंय, आमचा बाप जरी गावी कुठे जन्माला आला असेल. आता त्यांनी वापरलेले शब्द शशी थरूर यांना पाठवतो. हातात कायदा आहे म्हणून सभागृह कसेही चालवायचे का?“ असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

## विश्वास नांगरे पाटील नागपूरचे नवे पोलिस आयुक्त

नागपूर दि.२३ (प्रतिनिधी)- नागपुरचे पोलीस आयुक्त डॉ.रविंद्रकुमार सिंगल यांची बदली करण्यात आली असून आता ‘फायरब्रँड’ अधिकारी अशी ओळख असलेले विश्वास नांगरे पाटील हे नागपुरचे नवे पोलीस आयुक्त असतील. गृहविभागाकडून मंगळवारी सायंकाळी यासंदर्भात आदेश जारी करण्यात आला. मुख्यमंत्र्यांचे शहर व उपराजधानी असलेल्या नागपुरात मागील काही काळापासून कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती ढासळलेली होती. आता नांगरे पाटील यांच्याकडून नागपुरकरांच्या अनेक अपेक्षा आहेत.

गृह विभागाकडून जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार डॉ.रविंद्रकुमार सिंगल यांची लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अपर पोलीस महासंचालकपदी बदली करण्यात आली आहे. तर अपर पोलीस महासंचालक विश्वास नांगरे पाटील यांच्याकडे नागपुरची जबाबदारी देण्यात आली आहे.

## तरुण उद्योजक लोहगडावरून पडून मृत्यू झाल्याच्या घटनेला पोलिस तपासानंतर नवे वळण

### प्रियकराच्या मदतीने होणाऱ्या नवऱ्याचा काटा काढला, ट्रेकिंगला नेऊन दरीत ढकलले

पुणे दि.२३ (प्रतिनिधी)- विवाह निश्चित झाल्यानंतर नियोजित पत्नीने प्रियकराच्या मदतीने एका व्यावसायिक तरुणाचा लोहगडावर खून केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली. तरुण लोहगडावरुन पाय घसरुन दरीत पडल्याने त्याचा मृत्यू झाल्याची बतावणी तरुणीने केली होती. पुणे ग्रामीण पोलिसांची गुन्हे शाखा आणि लोणावळा ग्रामीण पोलिसांनी कौशल्यपूर्ण तपास करुन खून प्रकरणाचा छडा लावला. या घटनेबाबत पोलिसांनी सत्य समोर आणल्याने एकच खळबळ उडाली आहे.

केतन विशाल अगरवाल (वय २५, रा. लोढा बेलमाँटो टॉवर, गहुंजे, ता. मावळ, जि. पुणे ) असे खून झालेल्या तरुणाचे नाव आहे. या प्रकरणी सिया प्रवीण गोयल (वय २०, रा. लिलाकुंज, गंगाधाम-बिबवेवाडी रस्ता, बिबवेवाडी), चेतन बाबुलाल चौधरी (वय २२, रा. पार्श्वनाथनगर, कोंढवा बुद्रुक) यांना अटक करण्यात आली.

कोट्यधीश कुटुंबातील लग्नाची तयारी सुरू असताना, प्रेमातील अडसर दूर करण्यासाठी सिया गोयल आणि तिचा प्रियकर चेतन चौधरी या दोघांनी मिळून केतन अगरवालची लोहगड किल्ल्यावरून दरीत ढकलून हत्या केली. अगरवाल बिल्डर्सचे सुपुत्र केतन अगरवाल यांचा साखरपुडा सिया गोयलसोबत झाला होता. नोव्हेंबर महिन्यात जयपूरमधील १४ कोटींच्या भव्य पॅलेसमध्ये हे लग्न होणार होते. वऱ्हाडी मंडळींसाठी दोन विमाने देखील बुक करण्यात आली होती. एकीकडे लग्नाची थाटामाटात तयारी सुरू असताना, दुसरीकडे सिया तिच्या कॉलेज काळातील प्रियकर चेतन चौधरीसोबत केतनच्या हत्येचा कट रचत होती. केतनला ट्रेकिंगची आवड होती. त्यामुळे आधी विश्वास जिंकण्यासाठी सिया केतनसोबत लोहगडावर ट्रेकिंगला जाऊन आली होती.

दरम्यान, केतन आणि सियाचे बाली येथे प्री-वेडिंग शूट ठरले होते. मात्र, केतनशी लग्नच करायचं नसल्यानं सियाने केतनचा पासपोर्ट लपवला, ज्यामुळे मुंबई विमानतळावरून त्यांना बालीचा दौरा रद्द करावा लागला. बाली दौरा रद्द झाल्यानंतर, सियाने केतनसोबत कडाक्याचं भांडण केलं. अखेर सियाचा हट्ट पुरवण्यासाठी आणि तिचा (पान ४ वर)

## समाजविघातक प्रवृत्तींची ‘बी टीम’; शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा ‘कॉक्रोच जनता पार्टी’वर आरोप!

नवी दिल्ली दि.२३ (वृत्तसंस्था)- पेपरफुटीच्या मुद्द्यावरून देशभरात वातावरण तापलेले असतानाच, केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी आंदोलक आणि विरोधकांवर जोरदार निशाणा साधला. “हा केवळ काही घटकांचा स्टंट नसून, देशात अराजकता माजवू पाहणाऱ्या विध्वंसक शक्तींची ही ‘बी’ टीम आहे,” असा घणाघाती आरोप त्यांनी केला आहे. ‘एनडीटीव्ही’ला दिलेल्या एका विशेष मुलाखतीत ते बोलत होते.

नीट पेपरफुटीच्या प्रकरणांचा निषेध नोंदवण्यासाठी आणि शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यासाठी सोशल मीडियावर ‘कॉक्रोच जनता पार्टी’ (सीजेपी) या उपरोधिक/व्यंग्यात्मक संघटनेने आंदोलन छेडले होते. या आंदोलनाचा खरपूस समाचार धर्मेंद्र प्रधान यांनी घेतला आहे.

धर्मेंद्र प्रधान म्हणाले, “ही सरळ सरळ विध्वंसक घटकांची ‘बी’ टीम आहे. ज्यांना जनतेने लोकशाहीत नाकारले आहे, तेच आता वेगळ्या मुखवट्यांआड लपून यंत्रणेला टार्गेट करत आहेत. देशाचे तुकडे (पान ४ वर)

## विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकरांनी आशाताईंच्या निधन प्रस्तावावेळी मराठी भाषेची चिरफाड केली, राज ठाकरेंचा संताप

मुंबई दि.२३ (प्रतिनिधी)- आपल्या सदाबहार गाण्यांनी अजरामर ठरलेल्या गानसम्राज्ञी पद्मविभूषण आशाताई भोसले यांचे काही दिवसांपूर्वी निधन झाले. देशभरातून आशाताईंना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यांच्या निधनानंतर विधिमंडळाचे हे पहिलेच अधिवेशन होत असल्याने विधानसभा सभागृहातही त्यांच्या निधनाचा शोक प्रस्ताव ठेवण्यात आला होता. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकरांनी तो वाचून दाखवला. मात्र, तो शोकप्रस्ताव वाचताना त्यांच्याकडून झालेल्या चुकीच्या उल्लेख आणि उच्चारावरुन मनसेप्रमुख राज ठाकरेंनी चांगलाच संताप व्यक्त केला आहे. पद्मविभूषण आशाताई भोसलेंच्या निधनाचा शोकप्रस्ताव मांडताना, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी ज्या पद्धतीने मराठी भाषेची चिरफाड केली आणि कागदावर लिहून दिलेलं मराठी पण त्यांना वाचता येत नाही हे पाहून संताप, उद्वेग दोन्ही दाटून आला. वाचण्या आधी त्या कागदातून भेळ खाल्ली होती का यांनी? अशा शब्दात राज ठाकरेंनी संतप्त भावना बोलून दाखवल्या.

आशाताईंच्या निधनाचा हा प्रस्ताव राहुल नार्वेकरांनी स्वाहिली अथवा हिब्रू भाषेत मांडला असता तरी चाललं असतं, कारण त्यांचं मराठी पण कळलं नाही आणि स्वाहिली, हिब्रू तसं पण कोणालाच कळत नाही. बरं अजून एक शोकांतिका म्हणजे नार्वेकर, दीनानाथ मंगेशकरांचा उल्लेख दीनदयाल मंगेशकर करत होते आणि वाट्टेल तसं मराठी वाचून दाखवत होते त्यावेळेस सभागृहात उपस्थित एकाही आमदाराला आक्षेप नोंदवावासा वाटला नाही. नार्वेकरांना ना दीनानाथ मंगेशकर माहित आहेत ना दीनदयाळ उपाध्याय माहित आहेत. भाजपने जी काही खोगीरभरती सुरु केली आहे त्यात त्यांची अवस्था तेलही गेलं, तूपही गेलं, हाती आलं धुपाटणे अशी झाली आहे, असे (पान ४ वर)

## धनंजय मुंडेंकडून विलास घुलेच्या हत्येचा मुद्दा विधानसभेत

बीड दि.२३ (प्रतिनिधी)- जिल्ह्यातील केजमध्ये झालेल्या हत्याप्रकरणाचे पडसाद आज विधिमंडळात पाहायला मिळाले. परळीचे आमदार धनंजय मुंडे यांनी विधानसभेत या हत्याप्रकरणातील मास्टरमाईंडचा पोलिसांकडून बचाव केला जात असल्याचं त्यांनी म्हटलं. तसेच, याप्रकरणी सखोल चौकशी करुन दोषींवर कारवाईची मागणीही त्यांनी विधानसभा अध्यक्षांकडे केली. तर, मंत्री पकंजा मुंडे यांनीही, विलास घुले या तरूणाच्या मृत्यूची घटना अतिशय दुर्दैवी आहे. पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांना पोलिसांनी कसल्याही दडपणाला बळी न पडता दोषींवर कडक कारवाई करावी, अशा सूचना दिल्या आहेत.

केज तालुक्यात २० जूनच्या रात्री घडलेल्या दुर्दैवी घटनेत हत्येचा कट रचून एकावर हल्ला केला. मात्र, सोडवण्यासाठी आलेल्या विलास घुले याच्यावर वार करून हत्या करण्यात आली. हे संपूर्ण प्रकरण पूर्वनियोजित कट असून याचा खरा सूत्रधार कोण, याचा शोध घेऊन विलास घुले याला न्याय मिळावा यासाठी केजमध्ये हजारो लोक घुले कुटुंबियांच्या सोबत (पान ४ वर)

# सहकार, साखर आणि सत्ता समीकरणे

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचा इचलकरंजी दौरा सहकाराच्या चौकटीपलीकडे जात पश्चिम महाराष्ट्रातील बदलत्या राजकीय समीकरणांचा संकेत देणारा ठरला. सहकार, साखर आणि वस्त्रोद्योगाच्या अपेक्षांच्या पार्श्वभूमीवर झालेल्या या दौऱ्यातून भाजपने सहकार क्षेत्रातील आपली पकड मजबूत करण्याचा संदेश दिल्याची चर्चा सुरू झाली आहे.

केंद्रीय गृहमंत्री आणि सहकारमंत्री अमित शहा यांचा नुकताच झालेला इचलकरंजी दौरा हा केवळ एका सहकारी बँकेच्या प्रशासकीय इमारतीच्या उद्घाटनापुरता किंवा कारखान्याच्या नामविस्ताराच्या कार्यक्रमापुरता मर्यादित राहिला नाही. दौऱ्यापूर्वी या भेटीकडे सहकार क्षेत्रातील प्रलंबित प्रश्न, साखर उद्योगाच्या अपेक्षा आणि वस्त्रोद्योगाला मिळू शकणाऱ्या संभाव्य दिलाशाच्या पार्श्वभूमीवर पाहिले जात होते. मात्र, कार्यक्रमानंतर शहा यांच्या भाषणातील मुद्दे आणि त्यातून देण्यात आलेल्या राजकीय संदेशामुळे पश्चिम महाराष्ट्रातील आगामी राजकीय समीकरणांबाबत नव्या चर्चांना सुरुवात झाली आहे. इचलकरंजी येथील कल्लाप्पाण्णा आवाडे इचलकरंजी जनता सहकारी बँकेच्या नूतन मुख्यालयाच्या उद्घाटन सोहळ्यानिमित्त राज्यभरातील नागरी सहकारी बँकांचे प्रतिनिधी, साखर कारखान्यांचे पदाधिकारी तसेच भाजपचे नेते एकाच व्यासपीठावर उपस्थित राहिले.

या निमित्ताने शहरी सहकारी बँकांच्या संचालकांच्या कार्यकाळावरील निर्बंध, डिजिटलायझेशन, सायबर सुरक्षा आणि नियामक अडचणी यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर चर्चा होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली होती. मात्र, शाह यांच्या भाषणाचा केंद्रबिंदू केवळ सहकार क्षेत्रापुरता मर्यादित राहिला नाही. सहकार क्षेत्राच्या बळकटीकरणावर भाष्य करतानाच त्यांनी राष्ट्रीय सुरक्षा, घुसखोरी आणि विरोधी पक्षांच्या राजकारणावरही थेट भूमिका मांडली. 'भारत ही काही धर्मशाळा नाही,' असे म्हणत त्यांनी काँग्रेस तसेच उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वावर अधिक तीव्र शब्दांत टीका केली.या वक्तव्याचे राजकीय विश्लेषण करताना एक महत्त्वाची बाब लक्षात घेणे आवश्यक ठरते. पश्चिम महाराष्ट्र हा राज्याच्या राजकारणात नेहमीच प्रभावशाली प्रदेश राहिला असून, विशेषतः सहकार चळवळीचा तो पारंपरिक बालेकिल्ला मानला जातो.

साखर कारखाने, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, नागरी पतसंस्था आणि विविध सहकारी संस्थांच्या माध्यमातून येथील सामाजिक, आर्थिक आणि राजकीय व्यवस्थेची घडी अनेक दशकांपासून बसलेली आहे. या सहकार व्यवस्थेवर दीर्घकाळ राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेसशी संबंधित नेत्यांचे वर्चस्व राहिले आहे. मात्र, बदलत्या राजकीय परिस्थितीत भाजपने सहकार क्षेत्राकडे विशेष लक्ष केंद्रित केल्याचे दिसून येत आहे. केंद्रीय सहकार मंत्रालयाच्या माध्यमातून सहकारी संस्थांमध्ये अधिक सक्रिय सहभाग वाढवणे, नव्या नेतृत्वाला संधी देणे आणि पारंपरिक राजकीय समीकरणांना आव्हान देण्याचा प्रयत्न भाजपकडून होत असल्याचे राजकीय निरीक्षकांचे मत आहे. त्यामुळे पश्चिम महाराष्ट्रातील सहकार क्षेत्रातील हालचालींना सध्या विशेष राजकीय महत्त्व प्राप्त झाले आहे. इचलकरंजीची निवडही याच व्यापक राजकीय रणनीतीच्या दृष्टीने महत्त्वाची ठरते. वस्त्रोद्योगाचे प्रमुख केंद्र असलेल्या या शहराचा सहकार क्षेत्राशीही मोठा संबंध आहे.

इचलकरंजीतून दिलेला राजकीय संदेश केवळ स्थानिक पातळीपुरता मर्यादित राहत नाही, तर कोल्हापूर, सांगली, सातारा आणि सोलापूर या जिल्ह्यांपर्यंत त्याचा प्रभाव जाणवू शकतो. त्यामुळे या भागातील राजकीय पकड मजबूत करण्यासाठी भाजपकडून या दौऱ्याकडे संघटनात्मक विस्ताराची संधी म्हणून पाहिले जात आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका तसेच भविष्यातील विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पश्चिम महाराष्ट्रातील सहकार क्षेत्रात स्थान निम र्ण करणे हे भाजपच्या राजकीय अजेंड्याचा महत्त्वाचा भाग असल्याचे दिसते. पारंपरिक सहकार राजकारणातील बदल, नव्या राजकीय समीकरणांची निर्मिती आणि ग्रामीण भागातील संघटन वाढवण्याच्या दृष्टीने हा दौरा महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे राजकीय जाणकारांचे मत आहे.

दुसरीकडे, सहकार क्षेत्रातील प्रतिनिधी आणि पदाधिकाऱ्यांचे लक्ष या दौऱ्यातून काही ठोस निर्णय आणि तातडीच्या उपाययोजनांकडे लागले होते. पश्चिम महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचा कणा मानल्या जाणाऱ्या सहकार क्षेत्रासाठी साखर उद्योगाला आर्थिक स्थैर्य देणारी मदत, ऊस उत्पादन वाढीसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, सहकारी बँकांसमोरील नियामक व आर्थिक अडचणी, तसेच डिजिटल सुविधांचा विस्तार यासंदर्भात सकारात्मक घोषणा होतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात होती. मात्र, दौऱ्यात मांडलेल्या विचारांमध्ये सहकार क्षेत्राच्या भविष्यासंदर्भात व्यापक धोरणात्मक भूमिका दिसून आली असली तरी, प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या दृष्टीने तातडीच्या निर्णयांची अपेक्षा असलेल्या घटकांना काही प्रमाणात निराशा जाणवली. सहकारी संस्थांना भेडसावणाऱ्या रोजच्या अडचणी, शेतकरी आणि कारखानदारांसमोरील आर्थिक प्रश्न, तसेच सहकारी बँकांच्या कामकाजातील अडथळ्यांवर ठोस घोषणा न झाल्याची भावना काही पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली. या पार्श्वभूमीवर इचलकरंजी दौऱ्याचे राजकीय आणि सामाजिक महत्त्व अधिक अधोरेखित झाले आहे.

दौऱ्यापूर्वी सहकार, उद्योग आणि विकास हे प्रमुख मुद्दे चर्चेच्या केंद्रस्थानी होते; मात्र दौऱ्यानंतर राजकीय संदेश, विचारधारा आणि सहकाराच्या माध्यमातून निर्माण होणाऱ्या नव्या समीकरणांवर अधिक चर्चा सुरू झाली आहे. पश्चिम महाराष्ट्रातील सहकार क्षेत्रावर दीर्घकाळ प्रभाव असलेल्या पारंपरिक राजकीय नेतृत्वाला पर्याय निर्माण करण्याचा प्रयत्न म्हणून या दौऱ्याकडे पाहिले जात आहे. सहकारी संस्था, साखर कारखाने, बँका आणि स्थानिक नेतृत्व यांच्यामध्ये नव्या राजकीय समीकरणांची जुळवाजुळव करण्याची रणनीती या दौऱ्यातून अधिक स्पष्ट झाल्याचे राजकीय निरीक्षकांचे मत आहे. भाजपकडून सहकार क्षेत्राला केवळ आर्थिक किंवा प्रशासकीय विषय म्हणून न पाहता, त्याला राजकीय विस्ताराचे माध्यम म्हणून वापरण्याचा प्रयत्न होत असल्याचे चित्र दिसून येते. मात्र, हा प्रयत्न प्रत्यक्षात कितपत यशस्वी होईल, हे आगामी काळात सहकारी संस्थांमधील निर्णय, स्थानिक नेतृत्वाची भूमिका आणि शेतकरी वर्गाचा प्रतिसाद यावर अवलंबून राहणार आहे. एकूणच, इचलकरंजी दौरा हा केवळ एका नेत्याचा कार्यक्रम न राहता पश्चिम महाराष्ट्रातील सहकार आणि राजकारणाच्या बदलत्या प्रवाहाचा संकेत देणारा ठरला आहे. आता खरी परीक्षा ही असेल की, या दौऱ्यातून दिलेला संदेश केवळ भाषणांपुरता मर्यादित राहतो की सहकार क्षेत्रात प्रत्यक्ष धोरणात्मक बदल घडवून आणत नव्या राजकीय आणि आर्थिक अध्यायाची सुरुवात करतो.

# एकनाथ शिंदे विरूध्द उद्धव ठाकरे

**मराठी** माणसाच्या न्याय हक्कासाठी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी १९ जून १९६६ रोजी मुंबईत शिवसेना स्थापन केली. बाळासाहेबांच्या करारी आणि लढाऊ नेतृत्वाने शिवसेना नेहमीच धगधगत राहिली. मुंबईतील मराठी माणसाला ताठ मानेने उभे करण्यामागे ठाकरे व त्यांनी स्थापन केलेली शिवसेनाच होती. माझा नेता व माझा पक्ष अशी भावना बाळासाहेब ठाकरे व शिवसेना यांच्याविषयी मराठी माणसाच्या हृदयात निर्माण झाली. याच शिवसेनेने मुंबईतील कामगार क्षेत्रातील लाल बावटा चळवळ संपवली, याच शिवसेनेने दोन्ही समाजवादी पक्षांना संकुचित केले हे त्यांनाही समजले नाही. तत्कालीन बलाढ्य काँग्रेस पक्षाला अंगावर घेण्याचे काम याच शिवसेनेने केले. भूमिपुत्रांना नोकऱ्यांमधे आणि घरांमधे ८० टक्के हक्काचा वाटा मिळाला पाहिजे यासाठी लढणारी हीच शिवसेना होती. भारतीय कामगार सेना , स्थानिय लोकाधिकार समिती, विद्यार्थी सेना अशा आघाड्यांवर शिवसेना नेहमी रस्त्यावर दिसायची. शिवसेना ही मुंबईतील मराठी माणासाची शक्ति होती, मराठी माणसाचे कवच होते. शिवसेना चार अक्षरांचा मुंबईत जबरदस्त दरारा होता. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे या नावाचा सार्वजनिक जीवनात मोठा दबदबा होता. मातोश्रीवर रोज खुला जनता दरबार असायचा, आपले म्हणणे ऐकून घेणारा व न्याय मिळवून देणारा नेता अशी त्यांची जनतेत प्रतिमा होती. दत्ताजी साळवी, मनोहर जोशी, प्रमोद नवलकर, छगन भुजबळ, नारायण राणे, सुधीर जोशी, वामनराव महाडिक, सतीश प्रधान, लिलाधर डाके, शरद आचार्य, दत्ताजी नलावडे, मधुकर सरपोतदार, सूर्यकांत महाडिक, सुभाष देसाई, अशा अफाट जनसंपर्क असलेल्या नेत्यांची मालिका हे शिवसेनेचे वैभव होते. राज ठाकरे, धर्मवीर आनंद दिघे, एकनाथ शिंदे, गणेश नाईक ही पक्षाची श्रीमंती होती. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या निधनानंतर पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना राज्याचे मुख्यमंत्री होण्याचीही संधी मिळाली. जोपर्यंत राज्यात शिवसेना- भाजपा युती होती तोपर्यंत गाडी रूळावर होती. पण ज्या दिवशी सर्वाधिक आमदार असलेल्या भाजपाला दूर सारून आणि काँग्रेसशी आघाडी करून उद्धव ठाकरे हे मुख्यमंत्री




झाले तेव्हापासूनच भाजपाच्या रडावर त्यांचे नाव नोंदवले गेले. पंचवीस वर्षांची युतीतील मैत्रीचे राजकीय दुष्मनीत रूपांतर झाले. त्याचे परिणाम उध्दव व त्यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेला सतत चार वर्षे भोगावे लागत आहेत. पक्षाच्या सहा खासदारांनी उद्धव यांच्या नेतृत्वाविरोधात केलेला उठाव व एकनाथ शिंदे यांच्या पक्षाशी केलेला घरोबा हे त्याचे ताजे उदाहरण आहे.

२०२४ मधे झालेल्या लोकसभा निवडणुकीत ठाकरे यांच्या शिवसेनेचे ९ खासदार निवडून आले. त्यातले संजय जाधव (वय५९, परभणी), भाऊसाहेब वाघचौरे (७६, शिर्डी), संजय देशमुख (५८, यवतमाळ- वाशीम), नागेश पाटील अष्टीकर (५४, हिंगोली), ओमराजे निंबाळकर (४२, धाराशिव), संजय दिना पाटील (५७, ईशान्य मुंबई ) या सहा खासदारांनी ठाकरेंच्या शिवसेनेला जय महाराष्ट्र केला. हे सर्व खासदार मशाल चिन्हावर निवडून आले होते. या सर्वांनी बाळासाहेब ठाकरे व उद्धव ठाकरे यांचे बोर्डावर फोटो लावून मते मागितली होती. ठाकरेंच्या शिवसैनिकांनी मेहनत करून त्यांचा प्रचार केला होता. भाजपा- शिवसेना शिंदे पक्षाच्या विरोधात जनतेने त्यांना लोकसभेवर निवडून दिले होते. दोन वर्षांत नेमके असे काय घडले की , त्यांना ठाकरेंच्या पक्षात राहणे नकोसे झाले ? आपण पक्ष नेतृत्वावर नाराज असल्याचे त्यांनी कधी सांगितले नाही. पक्षाच्या नेमक्या कोणत्या निर्णयाबद्दल त्यांचे मतभेद झाले हे कधी पुढे आले नाही. पक्ष सोडून जाण्याची खरी कारणे पुढे आलेली नाहीत. या फुटीर खासदारांनी दोन वर्षात संसदेत महाराष्ट्राचे कोणते प्रश्न मांडले, मतदारसंघाला काय मिळवून दिले, पक्षाची कोणती भूमिका तडफफेने मांडली ? आता शिंदेंच्या पक्षात गेले, त्याचा राजकीय व आर्थिक लाभ त्यांना झाला असेल. पण जनतेच्या जीवनात काय फरक पडणार आहे ? आता हे सर्व फुटीर शिवेसनेचे धनुष्य- बाण हे चिन्ह आपल्या हाती घेणार आहेत, म्हणून ते एनडीएमधे येतील. लोकसभेत एनडीए सरकार विधयके किंवा ठराव सादर करील तेव्हा या खासदारांना सरकारच्या बाजुने मतदान करावे लागेल. महिला आरक्षण - मतदार संघ पुनर्रचना विधेयकाला याच खासदारांनी दोन म हिन्यापूर्वी लोकसभेत विरोध केला होता . आता ते पुन्हा सादर झाले की त्यावर आता बाजुने मतदान करावे लागेल.

शिवसेना स्थापना दिवस १९ जून. एकनाथ शिंदे यांनी बंडाचा झेंडा फडकावून शिवसेना हे नाव व निवडणूक चिन्ह काबीज केले, तेव्हापासून मुंबईत ठाकरे व शिंदे हे दोघेही शिवसेना वर्धापन दिन वेगवेगळा साजरा करतात. ठाकरे यांच्याकडे सत्ता नाही. राज्य गेले, महापालिका गेली, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत ठाकरे यांनी कधी रस घेतला नाही.

मुंबई महापालिका हाच ठाकरेंच्या शिवसेनेचा प्राणवायु होता. तो ऑक्सिजन सिलिंडरच भाजपाने आपल्याकडे हिसकावून घेतला आहे. सहा खासदारांनी ठाकरेंच्या पक्षावर प्रहार करून पळ काढण्याची नेमकी हीच वेळ का निवडली ? आता त्यांचे बॉस एकनाथ शिंदे आहेत. ते सर्व निर्णय मोदी- शहांना विचारूनच घेत असतात. शिवसेना वर्धापन दिनाच्या तोंडावर दिल्लीतून या सहा खासदारांनी वेगळा गट स्थापन करण्यासाठी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांना पत्र दिले. लोकसभा निवडणुकीत चार सौ पार ची घोषणा देणाऱ्या भाजपाला बहुमताचा आकडाही गाठता आला नव्हता. मग चंद्राबाबू - नितीशकुमार यांना बरोबर घेऊन एनडीए सरकारची स्थापना झाली. विधेयके मंजुर करण्यासाठी लोकसभेत ३६२ खासदारांचे संख्याबळ गरजेचे आहे. म्हणूनच आयारामांना भाजपाकडून पायघड्या घातल्या जात आहेत. अगोदर पंजाबमधील आम आदमी पक्षाचे सात खासदार फुटले व भाजपामधे आले. नंतर तृणमूल काँग्रेसचे बावीस खासदार फुटले व त्यांना न'शन'लिस्ट सिटिझन्स पार्टीमधे विलिन केले. आता ठाकरेंच्या शिवसेनेचे सात खासदार फुटले व त्यांना शिंदेंच्या शिवसेनेने पायघड्या घातल्या. काँग्रेसशी संबंध तोडलेल्या द्रमुकच्या २२ खासदारांवर भाजपाची नजर आहेच. शिवाय सपाचे खासदार फुटणार अशी कुजबुज चालू आहे.

शिंदे यांच्या शिवसेनेचे लोकसभेवर सात खासदार निवडून आलेत. प्रतापराव जाधव केंद्रात मंत्री आहेत. ठाकरेंचे सहा खासदार मिळाल्याने शिंदे यांच्या खासदारांची संख्या तेरा झाली आहे. केंद्रात आणखी एक मंत्रीपद मि ळेल अशी चर्चा सुरू आहे. आयाराम ंची भाजपाकडे रांग लागल्याने एनडीएम धील चंद्राबाबू नायडू व नितीश कुमार यांचे महत्व कमी होईल अशी चिन्हे आहेत. दुसरीकडे एकनाथ शिंदे यांचे राज्याच्या राजकारणात महत्व वाढेल. महाराष्ट्रात आपली राजकीय भूमिका अमलात आणण्यासाठी एकनाथ शिंदे अतिशय उपयुक्त नेता आहे, असे मोदी - शहांना समजले आहे. एकनाथ शिंदे जेवढे लोकांना भेटतात, दौरे करतात तेवढे कोणी करीत नाहीत. भाजपा हायकमांडशी सर्वाधिक जवळचे संबंध राखणारा हा नेता आहे. उध्दव ठाकरे यांचे नेतृत्व व त्यांचा पक्ष कमकुवत करण्यात एकनाथ यांचा सिंहाचा वाटा आहे. शिवसेनाप्रमुखांचे आपणच सच्चे वारस आहोत हा त्यांचा मंत्र आहे. ठाकरे पिता- पुत्र हे राज्यात कुठे फिरत नाहीत, फोन घेत नाहीत, जनसंपर्क नाही, पदाधिकारी- कार्यकर्ते यांच्याशी मुक्त संवाद नाही, पक्षाचे मुख्यालय असलेल्या शिवसेना भवनमधे नियमित जात नाहीत. मग जनमानस काय आहे, कार्यकर्त्यांची भावना काय आहे हे कसे समजणार ? ठाकरे भेटत नाहीत आणि शिंदे रात्री उशीरापर्यंत मुंबई- ठाण्यात भेटत असतात. त्याचा लाभ त्यांना मिळतो.

**- डॉ. सुकृत खांडेकर**

# ३२ वर्षानंतर 'लाड' कसे पुरवता येतील ?
# जेष्ठ अभ्यासक राजेंद्र दाते पाटील यांचा सवाल

नवी दिल्ली, दि. २३ (वृत्तसंस्था) - सर्वोच्च न्यायालयाच्या माधुरी पाटील विरुद्ध अतिरिक्त आयुक्त आदिवासी विकास ठाणे या प्रकारणातील २ सप्टेंबर १९९४ रोजी सर्वोच्च न्यायालयाच्या घटना पीठाचा निर्णय झाला आहे.याला आता ३२ वर्षा पेक्षा जास्त कार्यकाळ संपलेला असल्यामुळे ३२ वर्षानंतर ' लाड ' कसे पुरवता येतील ? असा म हत्वाचा कायदेशीर व घटनात्मक सवाल राज्य शासनाच्या एका प्रतिनिधीने म राठवाड्या तील आरक्षणा बाबत +केंद्र शासनाच्या सॉलिसीटर जनरल कडे विचारणा केल्यावर अंतिम निर्णय घेतला जाईल या अनुषंगाने जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी ही घटनात्मक त्रुटीची बाब पहिल्यां दाच पुढे आणली आहे.



मराठा आरक्षण एस ओ पी व नविन शासनादेश या बाबत आपले मत व्यक्त करतांना ते म्हणाले की,माधुरी पाटील या प्रकरणाचा न्यायनिवाडा सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापिठाने केलेला आहे या निर्णयात अर्जदार यांची वंशावळ महसूल पुराव्या आधारे आणि संपूर्ण नावाच्या आधारे जोडणारी असावी ही बाब महाराष्ट्र शासनाला मराठा आरक्षण देताना अडचणीची ठरत आहे म्हणून माधुरी पाटील या प्रकरणातील न्याय निवाडा बदलणे किंवा त्यामध्ये काही एक दुरुस्ती करण्याचा अधिकार भारतीय राज्यघटनेने राज्य शासनाला राज्याच्या विधानसभेला किंवा राज्याच्या विधान परिषदेला दिलेला नसल्यामुळे राज्य शासनाने एसओपी किंवा जीआर च्या आधारे या न्याय निवाडा बदलणे म्हणजे हा न्याय निवाडा अमान्य करुन त्यातील आदेश व निर्देश परस्पर बदलणे असे सिद्ध होऊन हा सन्माननीय घटना पिठाचा अवमान ठरू शकतो म्हणून माधुरी पाटील या प्रकरणातील न्याय निवाड्यातील आदेश दुरुस्त(मॉडीफाय) करून घेता येईल काय ?याची कायदेशीर माहिती भारताच्या सॉलिसीटर जनरल यांचे कडुन घेणार असल्याचे वक्तव्य शासनाच्या प्रतिनिधीने नुकतेच माध्यमा समोर केले आहे.

**कायदेशीर व घटनात्मक वेगळेच आहेत -** माधुरी पाटील न्यायनिवाडा आणि या निर्णया विरुद्ध (पुनर्विचार याचीका) दाखल करणे कायदेशीर रित्या शक्य आहे, परंतु त्या साठी अत्यंत मर्यादित कारणे असणे आवश्यक आहे आणि अत्यंत महत्वाचे म्हणजे यास वेळेची मर्यादा लागू होते आणि रिव्हिव पिटीशन दाखल करण्यासाठी मान्य असलेले ऑर्डर रूल१ ऑफ सुप्रिम कोर्ट रुल्स नवीन व महत्त्वपूर्ण माहिती/साक्षी शोधली गेली जी सुनावणी वेळी दुर्लक्षित होती किंवा प्रस्तुत करता येत नव्हती

अप्रत्यक्ष त्रुटी नैसर्गिक न्यायचे उल्लंघन असल्यास निर्णय झालेल्या तारखेपासून ३०दिवस पुर्ण होऊन गेलेले आहे (३२ वर्ष पुर्ण झाली आहेत.) आणि एवढ्या मोठ्या कालांतराने अथवा दिवसा नंतर रिव्हिव पिटीशन दाखल करणे कायदेशीर रीत्या शक्य नाही, (वेळेची मर्यादा संपली असल्याम ुळे ). जरी खुप खुप प्रयत्न केले तरी जर नवीन न्याय्य व्यतिक्रम किंवा स्पष्ट कायदेशीर त्रुटी आढळलीअसेल तर क्युरेटीव्ह पिटीशन विचारात घ्या ( परंतु वेळेची अडचण आहेच ) सध्याच्या कायदेशीर परिस्थितीत या जुन्या १९९४ निर्णया विरुद्ध नवीन अर्ज दाखल करण्याची शक्यता अत्यंत कमी आहे,अपवाद:किंवा जर त्या निर्णयाची अंमल बजावणी सध्याही चालू असेल आणि नवीन घटना घडली असेल,तर इम्प्लेमेंटेशन /एन्फोर्समेंट विषयक याचिका दाखल करता येईल ( पण रिव्हिव पिटीशन नाही). ही सामान्य कायदेशीर व घटनात्मक माहिती व प्रत्यक्ष कायदेशीर स्थिती आहे.

सर्वोच्च न्यायालयात क्युरेटिव्ह पिटीशन (उपचारात्मक याचिका) दाखल करण्याची प्रक्रिया पाहिली तर क्युरेटिव्ह पिटीशन ही सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्याची सर्वात अंतिम आणि असाधारण कायदेशीर उपाय आहे. याचा मुख्य उद्देश गंभीर न्यायिक अन्याय झाला असल्यास सुधारणे हा आहे, जिथे साम ान्य कायदेशीर प्रक्रिया तून न्याय मिळाली नाही. याचीका दाखल करण्याच्या अटी

महत्त्वपूर्ण बाब अशी आहे की,क्युरेटिव्ह पिटीशन साधारणता रिव्हिव पिटीशन खारिज झाल्यावरच दाखल करता येते, थेट दाखल करता येत नाही आणि हे करायचेच असेल तर त्यासाठी सर्वोच्च न्यायालयाचे सीनियर विधीज्ञाचे सर्टिफिकेट अनिवार्य आहे. क्युरेटिव्ह पिटीशन ही अत्यंत दुर्लभ उपाय आहे सर्वोच्च न्यायालयात ०.१% पेक्षा कमी स्वीकारली जातात हे वास्तव्य आहे.

महाराष्ट्र शासन राज्यात स्वतःचा वेगळा कायदा करू शकते काय?

भारतीय राज्यघटनेत राज्य शासनाला सर्वोच्च न्यायालयाच्या घटना पीठाचा निर्णय बदलणे, दुरुस्त करणे, त्यात काही बाबी समाविष्ट करणे किंवा रद्द करण्याचा कोणताही अधिकार नाही.महत्त्वाचे घटनेचे तथ्य आणि घटनेचे कलम १४१ या प्रमाणे सर्वोच्च न्यायालयाचा कायदा देशातील सर्व राज्यात किंवा त्यांच्या कार्य क्षेत्रात बांधन कारक आहे.परिच्छेद १४४ सर्व अधिकार व संस्थान सर्वोच्च न्यायालयाला मदत करणे बंधन कारक आहे.

**घटनेतील परिच्छेद ३६८:**

घटना दुरुस्तीचा अधिकार फक्त भारतीय संसदेस म्हणजेलोकसभा - राज्यसभेस आहे. यातील महत्वाची बाब आणि निष्कर्ष असा आहे की,राज्य शासनास घटनापीठाच्या निर्णया नुसार कार्यवाही करणे बांधन कारक आहे. निर्णय रद्द करण्यासाठी फक्त संसद घटनादुरुस्ती करू शकते, पण राज्य शासन स्वतःहून निर्णय बदलू शकत नाही किंवा घटनापीठाच्या निर्णयाला बदलण्याचा अधिकार फक्त सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णय दिलेल्या घटनापीठा पेक्षा म ोठ्या घटना पीठास आहे जसे पाच न्यायधिशांच्या घटना पीठा पेक्षा मोठे सात -त्या पेक्षा मोठे नऊ -त्या पेक्षा मोठे अकरा -त्या पेक्षा मोठे घटनापीठ हे तेरा न्यायधिशांचे असावे लागते यांचे उदाहरण द्यायचे असेल तर स्वामी केशवानंद भारती विरुद्ध भारत सरकार हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयाच्या सन्म ाननीय १३ न्यायधिशांच्या घटनापीठासम ोर सुनावणीस होते. आणि पूर्वीचा निर्णय ज्या घटना पीठा समोर झाला असेल त्या पेक्षा मोठे घटनापीठ(लार्जर बेंच) स्थापना सी जे आय म्हणजे भारताचे सर न्यायाधीशच करू शकतात. त्यामुळे राज्य शासनास असा काही एक कायदेशीर व घटना त्मक अधिकार मुळातच नाही. म्हणजेच राज्यघटनेत बदल/दुरुस्ती करण्याचा अधिकार परिच्छेद ३६८ प्रमाणे फक्त संसदेस आहे तो अधिकार विधिमंडळाला किंवा राज्य शासनाला अजिबात नाही. महत्त्वपूर्ण असे आहे की रिव्हिव पिटीशन न्यायालया च्या निर्णयाची पुनर्वाद करण्यासाठी नाही,तर फक्त स्पष्ट त्रुटी दुरुस्त करण्यासाठी आहे या साठी वेळेची मर्यादा असुन रिव्हिव पिटीशन ही निर्णय झालेल्या तारखेपासून ३० दिवसांत दाखल करावी लागते असे सामान्य कायदेशीर नियम आहेत. १९९४ चा निर्णय असल्याने, गेल्या ३२ वर्षा पेक्षा जास्त झालेल्या वर्षांत याचिका दाखल करण्याची वेळ संपली आहे क्युरेटिव्ह पिटीशन जर पुनर्वीचार याचीका खारिज झाली असेल,तरचउपचारात्मक याचीका दाखल करता येते, परंतु फक्त गंभीर न्याय्य व्यतिक्रम (ग्रेव्ह मीस कॅरेजेस ऑफ जस्टिस) असल्यास नैसर्गिक न्यायचे उल्लंघन असल्यास हा अंतिम उपाय आहे,परंतु १९९४ पासून ३२ वर्षापेक्षा पेक्षाही जास्त वर्षे झालेली असल्यामुळे उपचारा त्मक याचीका दाखल करण्याची वेळही संपली आहे त्यामुळे आमचे सातत्याने असलेले अभ्यासपुर्ण निवेदनच सतत सत्य ठरलेले असल्यामुळे कायद्या समोर किंवा घटनात्मक तरतुदी मध्ये कोणतेही 'लाड' चालत नाही हे अंतिम सत्य सर्वांना मान्यच करावे लागेल अशी महत्वाची कायदेशीर व घटनात्मक बाब जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी पुढे आणली आहे. हीच बाब त्यांनी गेली अनेक वर्षे सातत्याने विविध आयोग यांचे समोर मांडलीअसुन अगदी याच वर्षी दस्तूर खुद्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील व राज्य शासना च्या प्रशासनिक अधिकारी यांचे समक्ष १८६ स्लाईड असलेले विविध न्याय निवाडे, त्यात दिलेले निर्णय अनुक्रमांक निहाय आणि पान निहाय हाय लाईट केलेले पी पी टी (पॉवर पॉईट प्रेझेंटेशन ) द्वारे अंत्यन्त अभ्यासु मांडणी केलेली असल्यामुळे शासनास काहीच माहीत नाही?हे म्हणताच येणार नसुन आम्ही या बाबत ज्यांचे कडे पुरावे आहेत त्यांना कुणबी प्रमाणपत्र देणे व ज्यांचे कडे पुरावे नाही त्या मराठा समाजा साठी स्वतंत्र आरक्षण कसे देता येईल यांचे कायदेशीर व घटनात्मक विश्लेषण सुद्धा दस्तूर खुद्द मुख्यमंत्री व समितीचे अध्यक्ष यांचे समोर सादर केलेले आहे.म्हणुन झालेल्या निर्णय तारखेपासून ३० दिवसां नंतर पुनर्वीचार याचीका दाखल करणे कायदेशीर रीत्या वेळेची मर्यादा संपली असल्यामुळे शक्य नाही. १९९४ निर्णया विरुद्ध नवीन अर्ज दाखल करण्याची शक्यता अत्यंत रेअर म्हणजे कमी आहे.

# आंतरराष्ट्रीय एकल महिला दिन निमित्त: पालिकेच्या वतीने एकल महिला मार्गदर्शन शिबीर




वैजापूर, दि. २३ (प्रतिनिधी) - आंतरराष्ट्रीय एकल महिला दिन निमित्त नगर परिषद वैजापूरच्या वतीने मंगळवार(ता,२३) रोजी पालिकेत शहरातील एकल महिलाचे शिबिर सामाजिक कार्यकर्ते तथा सेवा निवृत्त शिक्षणाधिकारी धोंडीरामसिंह राजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आले.

नगराध्यक्ष डॉ. दिनेश परदेशी, उपाध्यक्ष रियाज अकिल शेख व मुख्याधिकारी भागवत बिघोत याच्या सहकार्याने हे शिबीर घेण्यात आले. महाराष्ट्र शासनाच्या महिला विकास खात्याकडून १६जून-२०२६रोजी काढलेल परिपत्रकाच्या नुसार लवकरच शासन 'एकल महिला' सक्षमीकरण धोरण आखणार आहे . धोंडीरामसिंह राजपूत यांनी महिलांच्या प्रश्न,समस्या,व अडवणुकीवर मार्गदर्शन केले. एकल महिलांची समाजात व विविध कार्यालयात होणारी अडवणूक थांबावी, त्यांना गरजेची विविध प्रमाण पत्रे मिळावी, समाजात त्याचा अपमान थांबावा,त्यांना समाजाने व शासनाने सन्मानाने वागवावे, त्या स्वावलंबी व्हाव्यात व सक्षम व्हाव्यात म्हणून सर्व थरावर सर्वंकष प्रयत्न व्हावे असे त्यांनी प्रतिपादित केले. प्रथम महिलांना सन्मान देणारे व महिलांच्या साठी कार्य करणारे थोर समाजसुधारक महात्मा जोतिबा फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या समयी पालिकेचे उपमुख्याधिकारी साठे, महिला बचत गट समनवयक दिवाकर त्रिभुवन, सहाय्यक सुमन काकडे, जगदिश पहाडी, अंगणवाडी सेविका मनीषा चव्हाण, निर्मला बोरगे, यांच्या सह शहरातील ७०-८० एकल महिला या शिबिरात उपस्थित होत्या.या सर्वांची माहिती संकलित करण्यात आली आहे.

# सत्यापन ॲप किंवा सेतू सुविधा केंद्रच्या माध्यमातून ऑनलाईन सुविधा उपलब्ध

छत्रपती संभाजीनगर, दि.२३ (प्रतिनिधी) - संजय गांधी योजना (शहर विभाग), छत्रपती संभाजीनगर यांच्या अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या 'संजय गांधी निराधार योजना' आणि 'श्रावणबाळ वृद्धपकाळ निवृत्तीवेतन योजने'च्या सर्व लाभार्थ्यांनी आपले हयात प्रमाणपत्र (Digital Life Certificate) केवळ "Beneficiary Satyapan App' द्वारेच सादर करणे अनिवार्य करण्यात आले आहे.सर्व संबंधित लाभार्थ्यांनी वेळेत आपले डिजिटल हयात प्रमाणपत्र सादर करून योजनेचा लाभ निरंतर सुरू ठेवावा, असे आवाहन तहसीलदार दिनेश झांपले, संजय गांधी शहर विभाग, यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

लाभार्थ्यांनी गुगल प्ले स्टोअरवरून 'Beneficiary Satyapan App' डाऊनलोड करून स्वतःचे हयात प्रमाणपत्र विनामूल्य सादर करावे. ज्या लाभार्थ्यांना स्वतः ॲप हाताळणे शक्य नाही, त्यांनी जवळच्या सेतू सेवा केंद्र किंवा नागरी सेवा केंद्रावर जाऊन ही प्रक्रिया पूर्ण करावी.केंद्रांवर प्रमाणपत्र सादर करण्यासाठी लाभार्थ्यांकडून जास्तीत जास्त ५० रुपये इतकेच सेवा शुल्क आकारले जावे. केंद्रांनी कोणत्याही प्रकारची अवास्तव रक्कम मागू नये, अशा कडक सूचना प्रशासनाने दिल्या आहेत.

एप्रिल २०२६ पासून सुरू असलेली ऑफलाईन प्रमाणपत्र स्वीकारण्याची पद्धत बंद करण्यात आली असून, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या ७ मे २०२६च्या शासन निर्णयाद्वारे हयात प्रमाणपत्र सादर करण्याचे निर्देशित करण्यात आलेले आहे.

# नांदेड विभागातील विशेष तिकीट तपासणी मोहिमेत ५४३ प्रकरणे निष्पन्न; रू. ३.८१ लाख महसूल वसूल

नांदेड, दि. २३ (प्रतिनिधी) - विनातिकीट प्रवासाला आळा घालणे आणि रेल्वेच्या महसुलाचे संरक्षण करणे या उद्देशाने दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागात दि. १९ जून २०२६ रोजी सकाळी ०६:०० ते सायंकाळी २०:०० या कालावधीत विशेष तिकीट तपासणी मोहीम राबविण्यात आली.

या मोहिमेवर सहाय्यक वाणिज्य व्यवस्थापक (ACM), नांदेड श्री शैलेश कुमार सिंह यांनी देखरेख ठेवली. विभागातील सर्व पथकांमधील एकूण २७ तिकीट तपासणी कर्मचाऱ्यांनी या व्यापक मोहिमेत सहभाग घेतला. मोहिमेदरम्यान विभागातील २६ रेल्वेगाड्यांमध्ये तपासणी करण्यात आली. या तपासणीदरम्यान विनातिकीट प्रवास, अनियमित प्रवास तसेच बुक न केलेल्या सामानासंदर्भातील एकूण ५४३ प्रकरणे आढळून आली. त्यातून भाडे, दंड आणि इतर शुल्काच्या स्वरूपात एकूण रू. ३,८०,५५० इतका महसूल वसूल करण्यात आला. ५४३ प्रकरणांमधून प्राप्त झालेला हा महसूल रेल्वे प्रवास नियमांचे पालन सुनिश्चित करण्यासाठी तसेच रेल्वेच्या उत्पन्नाचे संरक्षण करण्यासाठी नांदेड विभागाच्या कटिबद्धतेचे प्रतीक आहे. नांदेड विभाग प्रवाशांना वैध तिकीट किंवा अधिकृत प्रवास परवानगीसह प्रवास करण्याचे तसेच सामानाची नियमानुसार बुकिंग करण्याचे आवाहन करीत आहे. प्रामाणिक प्रवाशांना अधिक चांगला प्रवास अनुभव मिळावा आणि न्याय्य प्रवास पद्धतींना प्रोत्साहन मिळावे यासाठी अशा विशेष तपासणी मोहिमा नियमितपणे राबविण्यात येतील. दक्षिण मध्य रेल्वे सर्व प्रवाशांना सुरक्षित, आरामदायी आणि नियमबद्ध प्रवास सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी कटिबद्ध आहे.

# 'महाज्योती'कडून स्पर्धा परीक्षा प्रशिक्षणासाठी अर्ज प्रक्रिया सुरू

**राज्यातील** बहुजन समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांची प्रशासकीय सेवांमध्ये अधिकाधिक निवड व्हावी आणि आर्थिक अडचणींमुळे कोणत्याही विद्यार्थ्याच्या यशस्वी करिअरच्या वाटचालीत अडथळा निर्माण होऊ नये, या उद्देशाने महाराष्ट्र शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागांतर्गत कार्यरत असलेल्या महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूरने २०२६-२७ या शैक्षणिक सत्रासाठी विविध स्पर्धा परीक्षांच्या मोफत ऑफलाईन प्रशिक्षण उपक्रमाची अर्ज प्रक्रिया सुरू केली आहे. या उपक्रमाचा लाभ राज्यातील राज्यातील इतर मागास वर्ग (ओबीसी), विमुक्त जाती-भटक्या जमाती (व्हीजेएनटी) व विशेष मागास प्रवर्ग (एस.बी.सी) प्रवर्गातील विद्यार्थ्यांना मिळणार असून गुणवत्तापूर्ण मार्गदर्शन, अभ्याससाहित्य आणि स्पर्धा परीक्षांची सक्षम तयारी करण्याची संधी उपलब्ध होणार असल्याची माहिती महाज्योतीचे व्यवस्थापकीय संचालक मा. मिलिंद नारिंगे यांनी दिली.

या प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत इन्स्टिट्यूशन ऑफ बँकिंग पर्सनल सिलेक्शनच्या (आयबीपीएस) प्रोबेशनरी ऑफिसर (पीओ) आणि भारतीय जीवन बीमा निगम (एलआयसी) तर्फे असिस्टंट ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर (एएओ), रेल्वे भरती परीक्षा (आरआरबी), एमबीए (सीईटी-कॅट), पोलिस-मिलिटरी भरती, युनिव्हर्सिटी ग्रॅन्ट कमिशन (युजीसी)/नेट/सेट, कर्मचारी निवड आयोग (एसएससी-सीजीएल), टीएआयटी (शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी) तसेच उच्च शिक्षण, संशोधन, आंतरराष्ट्रीय शिष्यवृत्ती तसेच परदेशातील नामांकित विद्यापीठांमध्ये प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी जीआरई (ग्रेजुएट रेकॉर्ड एक्झामिनेशन), टोफेल (टेस्ट ऑफ इंग्लिश ॲज अ फॉरेन लँग्वेज), आयईएलटीएस (इंटरनॅशनल इंग्लिश लँग्वेज टेस्टिंग सिस्टिम) तसेच फॉरेन लैंग्वेज ट्रेनिंग या परीक्षांसाठी मोफत पूर्व प्रशिक्षण देण्यात येणार आहे. स्पर्धा परीक्षा प्रशिक्षणासाठी प्रवेशपूर्व चाचणी परीक्षेकरिता अर्ज मागविण्याची प्रक्रियेला सुरुवात झाली असून १० जुलै २०२६ ही अर्जाची अंतिम मुदत आहे. 'महाज्योती'चे व्यवस्थापकीय संचालक मा. मिलिंद नारिंगे यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांना केवळ प्रशिक्षणच नव्हे तर प्रत्येक महिन्याला निवास व भोजन व्यवस्थेसाठी विद्यावेतन तसेच प्रशिक्षणासाठी रुजू होताना एकरकमी आकस्मिक निधीदेखील देण्यात येणार आहे. नामांकित प्रशिक्षण संस्थांमार्फत हे प्रशिक्षण दिले जाणार असून विद्यार्थ्यांची निवड चाळणी परीक्षेच्या माध्यमातून केली जाईल. प्राप्त गुणांच्या आधारे गुणवत्ता यादी तयार करून अंतिम निवड करण्यात येणार आहे. स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हा उपक्रम अत्यंत उपयुक्त ठरणार असून राज्यभरातून अर्जांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. प्रशिक्षणासंदर्भातील सर्व निकष, अटी, शर्ती आणि अर्ज प्रक्रियेची माहिती www.mahajyoti.org.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात असल्याचेही महाज्योतीचे व्यवस्थापकीय संचालक मा. मिलिंद नारिंगे यांनी सांगितले. महाज्योतीचे मोफत स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण घेण्यासाठी राज्यातील इतर मागास वर्ग (ओबीसी), विमुक्त जाती-भटक्या जमाती (व्हीजेएनटी) व विशेष मागास प्रवर्ग (एस.बी.सी) तील विद्यार्थ्यांनी मोठ्याप्रमाणावर विहित कालावधीत अर्ज करावे. तसेच अधिक माहितीसाठी ०७१२-२८७०१२०/१२१ या क्रमांकावर विद्यार्थ्यांनी संपर्क करावा. विद्यार्थ्यांना अर्ज प्रक्रिया शेवटच्या दिवसापर्यंत न थांबवता वेळेत पूर्ण करण्याचे त्यांनी आवाहन केले आहे.

या उपक्रमामुळे अनेक होतकरू आणि गुणवंत विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांमध्ये यश संपादन करण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन आणि आर्थिक पाठबळ मिळणार असल्याचा विश्वास मा. मिलिंद नारिंगे यांनी व्यक्त केला आहे. अर्जासोबत आधार कार्ड, जात प्रमाणपत्र, वैध नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्र, १२ वी उत्तीर्ण प्रमाणपत्र, पदवी उत्तीर्ण गुणपत्रक अथवा प्रमाणपत्र, पदव्युत्तर शिक्षणाशी संबंधित कागदपत्रे तसेच दिव्यांग उमेदवारांसाठी ४० टक्क्यांपेक्षा अधिक दिव्यांगत्वाचा सक्षम प्राधिकाऱ्याचा दाखला अपलोड करणे आवश्यक आहे. सर्व कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतरच अर्ज स्वीकृत केला जाणार आहे.

विद्यार्थ्यांनी www.mahajyoti.org.in या संकेतस्थळावरील सूचना फलकामधील संबंधित परीक्षेची माहिती काळजीपूर्वक वाचून अर्ज भरावा.

अधिक माहितीसाठी ०७१२-२८७०१२०/१२१ या हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहनही मा. अतुल सावे यांनी केले आहे.

महाज्योती — ज्ञानदीप समतेचा —

## त्रुटीमुक्त अर्जच पात्रतेची गुरुकिल्ली : अतुल सावे

राज्याचे मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांसाठी गुणवत्तापूर्ण प्रशिक्षण उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न सुरू आहे. या पार्श्वभूमीवर स्पर्धा परीक्षा प्रशिक्षणासाठी ऑनलाईन अर्ज करताना विद्यार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रे स्पष्ट, स्वाक्षांकित आणि स्कॅन करून अपलोड करावीत, असे आवाहन राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपारिक ऊर्जा व दिव्यांग कल्याण विभागाचे मंत्री तथा 'महाज्योती'चे अध्यक्ष मा. अतुल सावे यांनी केले.

# पिंपरी-चिंचवडला मिळणार 'पुस्तकांची नगरी' म्हणून नवी ओळख

पुणे दि. २३ ( प्रतिनिधी ) - पिंपरी चिंचवड शहराला केवळ औद्योगिक नगरी म्हणून नव्हे, तर ज्ञान, साहित्य, संस्कृती आणि संशोधनाचे केंद्र म्हणून नवी ओळख मिळवून देण्याच्या उद्देशाने महापौर रवि लांडगे यांच्या संकल्पनेतून 'अक्षरविश्व' या अत्याधुनिक ज्ञानसंकुलाचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प साकार होत आहे. महानगरपालिकेच्या नुकत्याच झालेल्या सर्वसाधारण सभेत मौजे भोसरी (कासारवाडी) येथील सार्वजनिक सुविधा क्षेत्रातील सुमारे ८,८३१.३६ चौरस मीटर जागेवर आंतरराष्ट्रीय दर्जाचे अत्याधुनिक ग्रंथालय आणि ज्ञानसंकुल उभारण्याच्या उपसूचनेस मान्यता देण्यात आली. हा प्रकल्प आनंदग्राम सामाजिक सेवाभावी संस्था, भोसरी यांच्या माध्यमातून राबविण्यात येणार आहे.

या प्रकल्पाचे वैशिष्ट्य म्हणजे संपूर्ण 'अक्षरविश्व' ज्ञानसंकुल कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (सीएसआर) निधीतून उभारण्यात येणार असून महानगरपालिकेच्या निधीतील एकही रुपया खर्च होणार नाही. त्यामुळे शहरवासीयांना जागतिक दर्जाच्या ज्ञानसुविधा उपलब्ध होणार असून त्यासाठी महापालिकेवर कोणताही आर्थिक भार पडणार नाही. विशेष म्हणजे, प्रकल्पासाठी निधी कमी पडल्यास स्वतः आर्थिक योगदान देण्याची तयारी महापौर रवि लांडगे यांनी दर्शविली आहे.

'अक्षरविश्व' हे केवळ ग्रंथालय नसून एक सर्वसमावेशक ज्ञानसंकुल असेल. यामध्ये अत्याधुनिक ग्रंथालय, डिजिटल अभ्यासिका, ई-लायब्ररी, स्पर्धा परीक्षा अध्ययन केंद्र, संशोधन सुविधा, मराठी साहित्य परिषद कार्यालय, मनोमय कक्ष, व्याख्यान सभागृह, लेखक संवाद केंद्र, पुस्तक प्रकाशनासाठी स्वतंत्र सभागृह तसेच विविध शैक्षणिक, साहित्यिक आणि सांस्कृतिक उपक्रमांसाठी आवश्यक सुविधा विकसित करण्यात येणार आहेत.

# ऑपरेशन यात्री सुरक्षा आणि ऑपरेशन अमानत अंतर्गत आरपीएफ नांदेडला यश

नांदेड, दि. २३ (प्रतिनिधी) - रेल्वे सुरक्षा बल (आरपीएफ), नांदेड विभाग प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी आणि त्यांच्या मालमत्तेच्या संरक्षणासाठी सातत्याने कार्यरत असून, ऑपरेशन यात्री सुरक्षा आणि ऑपरेशन अमानत अंतर्गत उल्लेखनीय यश प्राप्त केले आहे.

**ऑपरेशन यात्री सुरक्षा अंतर्गत कारवाई** - दि. १८ जून २०२६ रोजी सुमारे २२:३० वाजता, उखइ-ऊाख, नांदेड येथे कार्यरत असलेले श्री अमोल वावळे, सहाय्यक उपनिरीक्षक (ASI)/RPF हे परभणी रेल्वे स्थानकाच्या प्लॅटफफॉर्म क्रमांक १ वर गाडी क्रमांक १२७५४ हजरत निजामुद्दीन - हजूर साहिब नांदेड एक्सप्रेसच्या थांब्यादरम्यान संशयित चोरट्यांवर पाळत ठेवत होते. यावेळी प्रवाशांच्या मालमत्तेची चोरी करण्याच्या उद्देशाने फिरत असलेल्या दोन संशयितांना त्यांनी ताब्यात घेतले.

अटक करण्यात आलेल्या संशयितांची नावे खालीलप्रमाणे आहेत : गोविंद (वय २९ वर्षे), रा. परभणी राहुल एस. (वय २४ वर्षे), रा. परभणी सदर दोघेही रेल्वेगाडीच्या मागील जनरल द्वितीय श्रेणी डब्यात चढणाऱ्या प्रवाशांना लक्ष्य करण्याच्या प्रयत्नात असल्याचे निदर्शनास आले. पुढील कारवाईसाठी त्यांना शासकीय रेल्वे पोलीस (जीआरपी), परभणी यांच्या ताब्यात देण्यात आले.

जीआरपी, परभणी यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियमाच्या कलम ११० व ११७ अंतर्गत चॅप्टर केस क्र. १३०/२०२६ नोंदवून कायदेशीर कार्यवाही सुरू केली आहे. ऑपरेशन अमानत अंतर्गत प्रामाणिकपणाचे उदाहरण दि. १९ जून २०२६ रोजी रेल मदत तक्रार क्रमांक २०२६०६१९०१९४१ प्राप्त झाली. तक्रारीनुसार, एका प्रवाशाने गाडी क्रमांक १७६१२ मधील एस-१ कोच, बर्थ क्रमांक ०६ येथे प्रवासादरम्यान सुमारे रू. ३,००० किमतीची लोखंडी फ्रेम विसरून ठेवली होती.

माहिती मिळताच श्री राजन भोकरे, मुख्य आरक्षक/ठझ्रक्र/ नांदेड यांनी तत्काळ संबंधित डब्याची तपासणी करून सदर वस्तू शोधून काढली व ती सुरक्षितपणे आरपीएफ पोस्ट, नांदेड येथे जमा केली.

यानंतर श्री राजरतन (वय ३७ वर्षे), रा. नांदेड यांनी आरपीएफ पोस्ट, नांदेड येथे उपस्थित राहून छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई ते परभणी प्रवासादरम्यान लोखंडी फ्रेम हरवल्याची माहिती दिली. आवश्यक पडताळणी पूर्ण झाल्यानंतर वरिष्ठ निरीक्षक, आरपीएफ/नांदेड यांच्या मार्गदर्शनाखाली सदर मालमत्ता योग्य मालकाकडे पावती घेऊन सुपूर्द करण्यात आली.


हरवलेली वस्तू सुरक्षितपणे परत मिळाल्याबद्दल संबंधित प्रवाशाने आरपीएफ नांदेडचे आभार व्यक्त केले.

या दोन्ही यशस्वी कारवायांमुळे आरपीएफ नांदेडची प्रवासी सुरक्षा, गुन्हे प्रतिबंध आणि प्रवाशांच्या मालमत्तेच्या संरक्षणाप्रती असलेली कटिबद्धता पुन्हा अधोरेखित झाली आहे.

# ऐतिहासिक निकाल: पंढरपूर येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी मूर्तीच्या रासायनिक लेपनास न्यायालयाची तात्काळ स्थगिती!

## मंदिर महासंघ आणि वारकरी संघटनांच्या याचिकेला मोठे यश | मूर्तीचे पावित्र्य जपण्यासाठी धर्मशास्त्रीय भूमिकेचा विजय

पंढरपूर, दि. २३ (प्रतिनिधी) - कोट्यवधी हिंदूंचे आराध्यदैवत असलेल्या पंढरपूरच्या 'स्वयंभू' श्री विठ्ठल-रुक्मिणी मूर्तीवर श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती आणि पुरातत्त्व विभागाकडून २३ आणि २४ जून रोजी प्रस्तावित असलेल्या रासायनिक वज्रलेपनास पंढरपूर येथील दिवाणी न्यायालयाने (कनिष्ठ स्तर) तात्काळ स्थगिती दिली आहे. वारकरी संप्रदाय आणि महाराष्ट्र मंदिर महासंघाने दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी करत, न्यायालयाने पुढील आदेश येईपर्यंत कोणत्याही प्रकारचे लेपन करण्यास मनाई केली आहे.



वारकरी संप्रदाय, श्री. बाळकृष्ण डिंगरे आणि महाराष्ट्र मंदिर महासंघाचे श्री. पुरुषोत्तम (गणेश) लंके यांनी पंढरपूर येथील दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) श्रीमती सोनाली राऊळ यांच्या न्यायालयात हा दावा दाखल केला होता. या प्रकरणी याचिकाकर्त्यांच्या वतीने अधिवक्ता सुधीर रानडे यांनी भक्कम युक्तिवाद केला. दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर न्यायालयाने मंदिर समितीला वज्रलेप न करण्याविषयी सक्त ताकीद दिली आहे.

न्यायालयात मांडण्यात आलेले महत्त्वाच्या मुद्द्यांमध्ये हिंदु धर्मशास्त्रानुसार मूर्ती ही केवळ दगडी किंवा पाषाण शिल्प नसून त्यात साक्षात देवत्व (प्राण) असते. काकड आरतीपासून ते नैवेद्यापर्यंत सर्व कृती याच भावनेतून केल्या जातात. मंदिर समिती केवळ 'दगडाची मूर्ती' समजून कृत्रिम आणि अपवित्र रासायनिक पदार्थांचा (उदा. इपॉक्सी) वापर करत आहे, ज्यामुळे मूर्तीचे देवत्व नष्ट होऊ शकते. आतापर्यंत ४ वेळा रासायनिक लेपन करूनही त्याचा फोलपणा सिद्ध झाला आहे. कृत्रिम रसायनांमुळे पाषाणाचे नैसर्गिक श्वसन रोखले जाऊन मूर्ती आतून अधिक ठिसूळ होण्याचा मोठा धोका आहे.

'महाकालेश्वर मंदिर' प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांचा न्यायालयात संदर्भ देण्यात आला. यानुसार भक्तांच्या धार्मिक भावना दुखावणारे कोणतेही निर्णय प्रशासनाला घेता येणार नाहीत. करवीर पीठाच्या जगद्गुरु शंकराचार्यांनी या रासायनिक लेपनास स्पष्ट विरोध करणारे पत्र दिले असून, न्यायालयाने त्याचीही नोंद घेतली आहे.

या निर्णयावर समाधान व्यक्त करताना महाराष्ट्र मंदिर महासंघाचे राष्ट्रीय संघटक श्री. सुनील घनवट यांनी प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. ते म्हणाले, तब्बल २८ युगे विटेवर सुखरूप उभा असणाऱ्या पांडुरंगाच्या मूर्तीच्या पायाला कोरोना टाळेबंदीच्या काळात खड्डा कसा पडला आणि श्री रुक्मिणीमातेचे पाय का खराब झाले? याचे कोणतेही शास्त्रीय उत्तर अद्याप मंदिर समिती किंवा पुरातत्त्व विभागाला देता आलेले नाही.

जिल्हाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत केवळ मते नोंदवली गेली; मात्र कोणती रसायने वापरणार आणि संवर्धन कसे करणार याची कोणतीही स्पष्ट माहिती प्रशासनाने दिली नाही. अचानक पत्रक काढून मंदिर बंद ठेवत वज्रलेपाचा निर्णय जाहीर केल्याने भाविकांमध्ये मोठा संभ्रम निर्माण झाला. मूर्ती संवर्धनासाठी 'आयुर्वेदिक वज्रलेप' हा अधिक सुरक्षित आणि परंपरेस अनुरूप असल्याचे आम्ही न्यायालयात सप्रमाण मांडले आहे. यापुढील काळात तरी मंदिर समिती वारकरी, धर्माचार्य, संत-महंत आणि हिंदुत्वनिष्ठ संघटनांच्या भावनांचा आदर करेल, अशी आम्हाला आशा आहे.

# प्रकाशकांनी ३० जूनपर्यंत वार्षिक विवरणपत्र दाखल करावे

छत्रपती संभाजीनगर दि. २३ (प्रतिनिधी) - प्रेस आणि नियतकालिक नोंदणी अधिनियम, २०२३ अंतर्गत नोंदणीकृत प्रत्येक नियतकालिकाने आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षित वार्षिक विवरणपत्र (अपर्पीरश्र डीरींशाशर्पी) प्रेस सेवा पोर्टल (झडझ) वर ऑनलाइन सादर करणे बंधनकारक आहे. आर्थिक वर्ष २०२४-२५ चे विवरणपत्र सादर न करणाऱ्या प्रकाशकांना ३० जून २०२६ पर्यंतची अखेरची संधी देण्यात आली आहे. यानंतर कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नसल्याचे भारत सरकारच्या प्रेस रजिस्टर जनरल, नवी दिल्ली यांनी सूचनांद्वारे कळिवले आहे.

प्रेस आणि नियतकालिक नोंदणी अधिनियम, २०२३ मधील कलम १४(१)(ब) व १४(३) नुसार, वार्षिक विवरणपत्र निर्धारित मुदतीत न भरल्यास संबंधित प्रकाशकावर दंड आकारण्याची तरतूद आहे. पहिल्या चुकीसाठी किमान दहा हजार रुपयांचा दंड आकारला जाईल. त्यानंतरच्या प्रत्येक चुकीसाठी दंडाची रक्कम मागील दंडाच्या दुप्पट असेल. मात्र, एकूण दंडाची कमाल मर्यादा दोन लाख रुपये निश्चित करण्यात आली असल्याचे प्रेस रजिस्टर जनरल, नवी दिल्ली यांनी दिलेल्या सूचनांमध्ये नमूद केले आहे.

आर्थिक वर्ष २०२४-२५ चे वार्षिक विवरणपत्र अद्याप सादर न केलेल्या प्रकाशकांनी ३० जून २०२६ पर्यंत ऑनलाइन दाखल करावे. या मुदतीनंतर विवरणपत्र सादर न केल्यास अधिनियमातील तरतुदीनुसार दहा हजार रुपयांचा दंड आकारण्यात येईल, असेही प्रेस रजिस्टर जनरल, नवी दिल्ली यांनी सूचनांमध्ये नमूद केले आहे.

# अग्रसेन विद्या मंदिर शाळेत यशवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव

**इटखेडा/- प्रतिनिधी** - पैठण रोड येथील अग्रसेन विद्या मंदिर शाळेत छत्रपती महाराजा अग्रसेन सभागृहात शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील इयत्ता १ ली ते ९ वी च्या गुणवंत विद्यार्थ्यांचा कौतुक सोहळा दि.२०/०६/२०२६ रोजी आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे संतोषजी डी. धानुका (सदस्य, अग्रसेन विद्या मंदिर) यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरूवातीला प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते दीप प्रज्वल करुन माता सरस्वती, भगवान श्री गणेश व छत्रपती महाराजा अग्रसेन यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. दरवर्षीप्रमाणे इयत्ता १ ली ते ९ वी मधील सर्व तुकड्यामधून सर्वप्रथम येर्णाया विद्यार्थ्यास प्रमुख पाहुणे संतोषजी डी. धानुका यांच्या हस्ते सायकल देऊन सन्मानित करण्यात आले. प्रमुख पाहुण्यांनी सर्व गुणवंत विद्यार्थ्यांच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल त्यांचे अभिनंदन केले आणि कठोर परिश्रम, समर्पण व चिकाटीच्या जोरावर जीवनात प्रत्येक क्षेत्रात यश संपादन करण्यासाठी त्यांना प्रोत्साहीत केले.

सन्मानित करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांची नावे खालीलप्रमाणे : इ.१ ली : विहान कुलकर्णी, इ.४ थी : ख्याति साकला, इ.७ वी : महती पापडीवाल, इ.२ री : श्रेया होलकर, इ.५ वी : ओजस जाधव, इ.८ वी : समृद्ध सातपुते, इ.३ री : रौनक राठी, इ.६ वी : वेदांगी पिलखाने, इ. ९ वी : आदित्य शिंदे.

याप्रसंगी व्यासपीठावर शाळा समितीचे अध्यक्ष सच्चानंदजी अग्रवाल, उपाध्यक्ष गोकुळजी अग्रवाल, सचिव निधीजी विजयजी अग्रवाल, कोषाध्यक्ष पंकजजी अग्रवाल, अग्रवाल सभा अध्यक्ष कुंजबिहारीजी अग्रवाल तसेच इतर सदस्यांची उपस्थिती होती. या प्रसंगी उपस्थित सर्व मान्यवरांनी यशवंत विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. प्रसंगी शाळेचे प्राचार्य संतोष कुमार करवा यांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या व नेत्रदिपक कामगिरीच्या सातत्याचा आशावाद व्यक्त केला.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# मनपा आयुक्तांकडून नवीन पाणीपुरवठा योजनेची पाहणी

## अपघातांची वाट न पाहता कामे पूर्ण करण्याचे अधिकाऱ्यांना कडक निर्देश



छत्रपती संभाजीनगर दि.२३ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर येथील नवीन पाणीपुरवठा योजनेच्या कामाची मनपा आयुक्त अमोल येडगे यांनी मंगळवारी (२३ जून) सकाळी १० वाजता प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी त्यांनी अधिकाऱ्यांना प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करण्याचे आणि अपघातांची वाट न पाहण्याचे कडक निर्देश दिले. विशेषतः, खोदलेल्या रस्त्यांची कामे पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्यावर त्यांनी भर दिला.

वाहेगाव येथील भीमाशंकर विद्यालयासमोर रस्त्यावर असलेल्या एअर व्हॉल्व्हमुळे अपघात घडत असल्याचे निदर्शनास आले. एनएचएआयने बॅरिकेडिंगसाठी स्वतंत्र निविदा काढली असली तरी, काम पूर्ण होईपर्यंत तात्काळ 'रेडियम' लावण्याचे आदेश आयुक्तांनी दिले. नाथ सीड्ससमोरील पाणी योजनेसाठी खोदलेल्या अर्धवट रस्त्याचे काम तत्काळ पूर्ण करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

या पाहणी दौऱ्यात आयुक्तांनी कामाचा आढावा घेत अप्रोच चॅनलसाठी त्वरित खोदकाम सुरू करण्याच्या सूचना दिल्या. तसेच, पावसाळ्यापूर्वी सर्व प्रलंबित कामे मार्गी लावण्याचे कडक निर्देश अधिकाऱ्यांना दिले.

सध्या ७५ अश्वशक्तीचे दोन फ्लोटिंग पंप बसवण्यात आले असून, त्याद्वारे ५० एमएलडी पाणी उपसा सुरू झाला आहे. पाण्याची गरज आणि कामाचा वेग लक्षात घेता, आयुक्तांनी आणखी दोन पंप तातडीने लावण्याचे आदेश दिले.

रस्त्यात अडथळा ठरणारे असे किती व्हॉल्व्ह आहेत, याचा तातडीने अपडेट देण्याच्या सूचना केल्या. शुगर फॅक्टरीसमोरील एअर व्हॉल्व्हचे काम गेल्या दोन महिन्यांपासून संथ गतीने सुरू असल्याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली व पावसाळ्यापूर्वी व्हॉल्व्हचे सर्व उरलेले काम पूर्ण करण्यास बजावले.

या पाहणी दौऱ्यात आयुक्तांसोबत कार्यकारी अभियंता वसंत भोये, ए. बी. देशमुख यांच्यासह महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे अधिकारी उपस्थित होते.

# संजय गांधी व श्रावणबाळ योजनेच्या लाभार्थ्यांसाठी 'डिजिटल हयात प्रमाणपत्र' बंधनकारक

### सत्यापन ॲप किंवा सेतू सुविधा केंद्रच्या माध्यमातून ऑनलाईन सुविधा उपलब्ध

छत्रपती संभाजीनगर दि.२३ (प्रतिनिधी)- संजय गांधी योजना (शहर विभाग), छत्रपती संभाजीनगर यांच्या अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या 'संजय गांधी निराधार योजना' आणि 'श्रावणबाळ वृद्धपकाळ निवृत्तीवेतन योजने'च्या सर्व लाभार्थ्यांनी आपले हयात प्रमाणपत्र केवळ 'Beneficiary Satyapan App' द्वारेच सादर करणे अनिवार्य करण्यात आले आहे.सर्व संबंधित लाभार्थ्यांनी वेळेत आपले डिजिटल हयात प्रमाणपत्र सादर करून योजनेचा लाभ निरंतर सुरू ठेवावा, असे आवाहन तहसीलदार दिनेश झांपले, संजय गांधी शहर विभाग, यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

लाभार्थ्यांनी गुगल प्ले स्टोअरवरून 'Beneficiary Satyapan App' डाऊनलोड करून स्वतःचे हयात प्रमाणपत्र विनामूल्य सादर करावे. ज्या लाभार्थ्यांना स्वतः ॲप हाताळणे शक्य नाही, त्यांनी जवळच्या सेतू सेवा केंद्र किंवा नागरी सेवा केंद्रावर जाऊन ही प्रक्रिया पूर्ण करावी.केंद्रांवर प्रमाणपत्र सादर करण्यासाठी लाभार्थ्यांकडून जास्तीत जास्त ५० रुपये इतकेच सेवा शुल्क आकारले जावे. केंद्रांनी कोणत्याही प्रकारची अवास्तव रक्कम मागू नये, अशा कडक सूचना प्रशासनाने दिल्या आहेत.

एप्रिल २०२६ पासून सुरू असलेली ऑफलाईन प्रमाणपत्र स्वीकारण्याची पद्धत बंद करण्यात आली असून, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या ७ मे २०२६च्या शासन निर्णयाद्वारे हयात प्रमाणपत्र सादर करण्याचे निर्देशित करण्यात आलेले आहे.

# समृद्धी महामार्गावर फॉर्च्यूनरचा भीषण अपघात; कारमधील पती-पत्नी जागीच ठार

बुलढाणा दि.२३ (प्रतिनिधी)- राज्यातील अपघाताच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होत असून कालच बदलापूरमधील भीषण अपघाताची घटना समोर आली होती. तर, समृद्धी महामार्गावरील अपघाताच्या घटना देखील नेहमीच समोर येत आहेत. आता, पुन्हा एकदा समृद्धी महामार्गावर झालेल्या भीषण अपघातात पती-पत्नी जागीच ठार झाले असून दोन लहान मुले जखमी आहेत. यासह, कारचा चालक देखील गंभीर जखमी असल्याची माहिती आहे. समृद्धी महामार्गावरील दुसरबीड जवळ ही दुर्घटना घडली. समृद्धी महामार्गावरील दुसरबीड जवळ भरधाव फॉर्च्यूनर कारने समोर धावणाऱ्या ट्रेलरला पाठीमागून धडक दिल्याने भीषण अपघात झाला. या अपघातात छत्रपती संभाजीनगर येथील पती-पत्नी जागीच ठार झाले असून कारमधील दोन चिमुरडे आणइ कार चालक गंभीर जखमी झाला आहे. जखमींना जालना येथे रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलं आहे. डॉ. सय्यद आसिफ सय्यद उमर हे आपल्या पत्नी गुलसीतान बी आणि कुटुंबासह नागपूरवरून संभाजीनगरच्या दिशेने जात होते. मात्र, समोर धावणाऱ्या ट्रकला त्यांच्या फोर्च्यूनर कारने अनियंत्रित होऊन धडक दिली. या धडकेत डॉ.सय्यद आसिफसह पत्नी गुलसितान बी हे दोघे पती-पत्नी जागीच ठार झाले असून त्यांच्या गाडीचा चालक आणि दोन लहान मुले जखमी झाले आहेत. हे कुटुंब नागपूरवरून संभाजीनगर छत्रपती संभाजी नगरच्या दिशेने जात होते.

(पान १ वरुन)

## प्रत्येक पोलीस ठाण्यात अमली..

दर्जाचा कोळसा पुरवून राज्याला अंधारात ढकलणाऱ्या दोषी कंत्राटदारांना आणि कंपन्यांना तातडीने ब्लॅकलिस्ट टाकण्याची मागणी केली. यावर उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, "कोळसा पुरवठ्याबाबत आम्ही केंद्रीय कोळसा मंत्र्यांसोबत महत्त्वाची बैठक घेतली असून कोळशाच्या अचूक सॅम्पलिंगबाबत राज्याची बाजू मांडली आहे. आता कोळसा पुरवठ्यासाठी जे नवीन टेंडर (निविदा) काढले जाईल, त्यात निकृष्ट कोळसा पुरवणाऱ्यांना आणि व्यवस्थेचा गैरफायदा घेणाऱ्यांना कोणतीही संधी मिळणार नाही, अशी कडक खबरदारी घेतली जाईल."

राज्यातील वाढत्या विजेची मागणी पाहता सरकार नवीन तंत्रज्ञानावर आधारित अधिक क्षमतेचे वीज निर्मिती संच उभे करणार का? असा प्रश्न वडेट्टीवार यांनी उपस्थित केला होता. यावर सकारात्मक उत्तर देत सरकारने सांगितले की, "राज्याची विजेची गरज भागवण्यासाठी चंद्रपूर येथे ८०० मेगावॅट क्षमतेच्या सुपर क्रिटिकल वीज प्रकल्पाबाबत सध्या वेगाने पाहणी आणि तांत्रिक प्रक्रिया सुरू आहे."

## प्रियकराच्या मदतीने होणाऱ्या नवऱ्याचा...

वाढदिवस साजरा करण्यासाठी केतन पुन्हा लोहगडावर ट्रेकिंगसाठी तयार झाला. कटानुसार प्रियकर चेतन चौधरी देखील लोहगडावर पोहोचला. त्याने स्वतःचा फोन न आणता कामगाराचा फोन आणला होता. ओळख लपवण्यासाठी त्याने हुडी आणि हेडफोन घातले होते. त्यावेळी फोटोसाठी पोज देत असतानाच, सिया आणि चेतनने मिळून केतनला खोल दरीत ढकलून दिले आणि केतनचा पाय घसरल्याचा बनाव रचला. केतनचा अपघात झाल्याचे भासवून सिया आणि चेतनने सर्व पुरावे नष्ट करण्याचा पुरेपूर प्रयत्न केला. मात्र, लोहगड परिसरातील सीसीटीव्ही फुटेजने पोलिसांना मोठा सुगावा दिला. या दोघांनी एकमेकांना केलेले संशयास्पद इशारे सीसीटीव्हीत कैद झाले. पोलिसांनी या तांत्रिक पुराव्यांच्या आधारे कसून चौकशी केली असता सिया आणि चेतनने आपला गुन्हा कबूल केला.

सियाचं हे कृत्य पाहून केतनने साखरपुड्यानंतर व्यक्त केलेली शंका वडिलांना आठवली आणि आपल्या हातून किती मोठी चूक झाली हे त्यांच्या लक्षात आलं. सिया आणि चेतनने रचलेला कट आणि नाहक केतनचा गेलेला जीव, यातून तिघांच्या आयुष्याशी राखरांगोळी झालीच, शिवाय तीन कुटुंबंही उद्ध्वस्त होण्याची वेळ आली. यातून परिस्थिती किती चिंताजनक आणि भीतीदायक बनली आहे हे यातून अधोरेखित होतं.

## समाजविघातक प्रवृत्तींची 'बी टीम';...

करण्याची भाषा करणाऱ्यांच्या समर्थनार्थ हे लोक घोषणाबाजी करत आहेत. त्यांचे खरे चेहरे आता समोर आले असून, त्यांची ओळख पटली आहे."

शिक्षणमंत्र्यांचे हे वक्तव्य अशा वेळी आले आहे, जेव्हा अवघ्या एका दिवसापूर्वीच देशभरातील २२ लाहुन अधिक वैद्यकीय विद्यार्थ्यांनी 'नीट'ची फेरपरीक्षा दिली आहे. महिन्यापूर्वी झालेली परीक्षा पेपरफुटीच्या आरोपांमुळे आणि गोंधळामुळे रद्द करण्यात आली होती. त्यानंतर देशभरातून संताप व्यक्त होत असतानाच, 'सीजेपी'ने प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी लावून धरली होती. "राष्ट्रीय परीक्षा एजन्सीने काही शिक्षकांवर मोठा विश्वास दाखवला होता, मात्र त्यांनी आपली जबाबदारी पार पाडली नाही. थोडक्यात सांगायचे तर, इथे 'रक्षकच भक्षक' बनले," अशा शब्दांत धर्मेंद्र प्रधान यांनी आपली नाराजी आणि उद्वेग व्यक्त केला आहे.

## विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकरांनी..

म्हणत राज ठाकरेंनी भाजपलाही टोला लगावला.

शोक प्रस्तावावेळी सभागृहात नक्की कोण उपस्थित होतं माहित नाही पण अनेक ज्येष्ठ आमदार इथे असणार हे नक्की. त्यांच्यापैकी एकानेही विरोध दर्शवला नाही? सभागृहात देवेंद्र फडणवीस उपस्थित होते का माहित नाही, पण असते तरी मला वाटत नाही त्यांना काही फरक पडला असेल. गुलाबी आंखे जो तेरी देखी सारखी अनेक गाणी ( स्वतः निर्माण केलेल्या बेसुरात) म्हणणाऱ्या फडणवीसांना आज आपल्या राज्यात विधानसभेत कोणत्या महान व्यक्तीला आपण श्रद्धांजली अर्पण करणार आहोत आणि त्याचं गांभीर्य काय असतं हे समजायला हवं होतं,

अशा शब्दात राज ठाकरेंनी फडणवीसांनाही लक्ष्य केलं. तसेच, फडणवीसांचं म्हणणं सोपं आहे, सांगितलेली फोडाफोडीची कामं होत आहेत ना बरोबर, अधिवेशनाचा उपचार पूर्ण होत आहे ना? बस झालं. दीनदयाल मंगेशकर म्हणो की दीनानाथ चौहान म्हणो काय फरक पडतो. शोकप्रस्ताव पण एक उपचारच आहे जो पार पडला, अशी खंतच राज यांनी बोलून दाखवली.

## धनंजय मुंडेंकडून विलास घुलेच्या हत्येचा...

रस्त्यावर उतरले आहेत. त्यामुळे पोलिस प्रशासनाने या प्रकरणात आरोपींची सर्व पाळे-मुळे खोदून काढत खरा सूत्रधार कोण आहे, याचा तपास करावा, अशी मागणी धनंजय मुंडे यांनी आज विधानसभेत पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशनच्या माध्यमातून केली आहे.


## निधन वार्ता



अशोकभाई शहा इनकी पत्नी एवं चिंतन शहा इनकी माताजी

**सौ. नयना अशोकभाई शहा**

उम्र ७२ वर्ष इनका दु:खद निधन मंगलवार २३ जुन २०२६ को सुबह ७.३० बजे हुआ ।

अंतिम यात्रा बुधवार दिनांक २४ जुन २०२६ को सुबह १०.०० बजे निजी निवास गोविंद भुवन अपार्टमेंट हॉटेल स्वाद रेस्टॉरंट के पिछे, उस्मानपुरा से प्रतापनगर स्मशानभुमी जायेंगी ।

* शोकाकुल *

अशोकभाई शहा

चिंतन अशोकभाई शहा, अवनी निरवकुमार शहा

एवं समस्त शहा परिवार

* प्रतिष्ठाण *

स्वाद रेस्टॉरंट ॲण्ड डायनिंग

उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर


# वैजापूरमध्ये विनापरवाना वॉटर प्लांटवर छापा; १० लाखांचा पॅकेज्ड पाणीसाठा जप्त, एफडीएची धडक कारवाई



छत्रपती संभाजीनगर दि.२३ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील वैजापूर तालुक्यातील गंगापूर येथे अन्न व औषध प्रशासनाने मोठी कारवाई केली आहे. एका विनापरवाना चालणाऱ्या पॅकेज्ड पिण्याच्या पाण्याच्या प्लांटवर छापा टाकण्यात आला. या छाप्यात १० लाख १ हजार ६०० रुपयांचा पॅकेज्ड पाण्याचा साठा जप्त करण्यात आला.

गोपनीय माहिती मिळाल्यानंतर अन्न व औषध प्रशासनाच्या पथकाने गंगापूर येथील या वॉटर प्लांटची अचानक तपासणी केली. तपासणीत असे आढळले की, हा व्यवसाय चालवण्यासाठी आवश्यक असलेल्या शासकीय परवानग्या घेण्यात आल्या नव्हत्या. वैध प्रमाणपत्रांविना ग्राहकांची दिशाभूल करून पाण्याची विक्री केली जात होती. या प्लांटमध्ये 'ओमरिच', 'यशरिच' आणि 'हायड्राशुअर' या तीन ब्रँडच्या नावाने पिण्याच्या पाण्याचे पॅकेजिंग सुरू होते. कारवाईदरम्यान, प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी तिन्ही ब्रँडच्या पाण्याचे एकूण पाच नमुने प्रयोगशालेय तपासणीसाठी घेतले आहेत. आवश्यक परवानग्यांचा अभाव आणि ग्राहकांची फसवणूक लक्षात घेऊन, अन्न व औषध प्रशासनाने या वॉटर प्लांटला तात्काळ 'व्यवसाय बंद करण्याची नोटीस' बजावली.

ही कारवाई राज्याचे अन्न सुरक्षा आयुक्त तुकाराम मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली अन्न व औषध प्रशासनाच्या पथकाने केली. जप्त केलेल्या पाण्याचे नमुने प्रयोगशाळेत पाठवण्यात आले असून, अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कायदेशीर कारवाई केली जाईल.

# अमृत आणि इंडो-जर्मन टूल यांचा संयुक्त प्रशिक्षण कार्यक्रम

छत्रपती संभाजीनगर दि.२३ (प्रतिनिधी)- 'अमृत' म्हणजेच महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी, पुणे आणि इंडो-जर्मन टूल रूम (भारत सरकारची संस्था) यांच्या संयुक्त विद्यमाने विशेष कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. पात्र उमेदवारांना अत्याधुनिक तांत्रिक कौशल्ये, प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर नामांकित कंपन्यांद्वारे नोकरी, तसेच व्यवसाय सुरू करण्यासाठी मार्गदर्शन व सहकार्यही मिळणार आहे.

इंडो जर्मन टूल रूम, संभाजीनगर ही भारत सरकारची संस्था असून त्याच्या महाराष्ट्रामध्ये इतरत्र चार शाखा आहेत. मुख्य शाखा संभाजीनगर येथे असून त्या ठिकाणी प्रशिक्षण सोबत राहण्याची सोय देखील उपलब्ध आहे. संभाजीनगर येथील शाखेमध्ये अतिशय दर्जेदार व उत्कृष्ट दर्जाचे मशिनरी आणि इतर उपकरणे उपलब्ध असून अत्यंत अचूकतेने काम करण्यासाठी अत्याधुनिक आणि उत्कृष्ट दर्जाचे प्रशिक्षण दिल्या जाते. या उत्कृष्ट दर्जाच्या प्रशिक्षणाचा लाभ अमृतच्या लक्षित गटातील उमेदवारांना मिळण्यासाठी 'अमृत' ने इंडो जर्मन टूल रूम यांच्यासोबत सामंजस्य करार केलेला आहे. व सुमारे ४५ विविध कोर्सेस साठी संधी उपलब्ध करून दिलेली आहे.

अमृतच्या या उपक्रमांतर्गत पात्र युवक-युवतींना नि:शुल्क प्रशिक्षण दिले जाणार आहे. प्रशिक्षणाचा संपूर्ण खर्च (प्रशिक्षण, राहणे व जेवण) अमृत, पुणे मार्फत केला जाईल. निवासी प्रशिक्षणाची सोय फक्त आय.जी.टी.आर. छत्रपती संभाजीनगर येथेच उपलब्ध असून संस्थेच्या पुणे, नागपूर, कोल्हापूर आणि वाळूंज उपकेंद्रात अनिवासी प्रशिक्षणाची सोय उपलब्ध आहे. उद्योग क्षेत्राच्या गरजा लक्षात घेऊन अभ्यासक्रमांची आखणी करण्यात आली असून, रोजगारक्षम कौशल्यांवर यात भर दिला जाणार आहे. या उपक्रमाचा मुख्य उद्देश राज्यातील विशेषतः ग्रामीण भागातील युवक-युवतींना आधुनिक काळातील कौशल्ये शिकवून त्यांना आत्मनिर्भर बनवणे हा आहे. कौशल्यांअभावी कोणीही रोजगारापासून वंचित राहू नये आणि युवकांची रोजगारक्षमता वाढावी, यासाठीच ह्या प्रशिक्षण कार्यक्रमाची निर्मिती करण्यात आली आहे.

**पात्रता व अटी -** या प्रशिक्षणासाठी पात्रता अट म्हणजे उमेदवार खुल्या वर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक प्रवर्गातील अमृतच्या लक्षित गटातील असावा. त्याची आवश्यक शैक्षणिक पात्रता संबंधित अभ्यासक्रमासाठी निश्चित केल्याप्रमाणे असेल. वयोमर्यादा व इतर अटी घ्उऊं संस्थेच्या नियमानुसार लागू राहतील. आवश्यक सर्व कागदपत्रांसह अर्ज करणे बंधनकारक राहील.

**अर्ज कुठे करायचा? -** खुल्या वर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील वयोगट १८ ते ४० मधील इच्छुक पात्रताधारक उमेदवारांनी अमृत संस्थेच्या www.mahaamrut.org.in या संकेतस्थळावर जाऊन ऑनलाईन अर्ज करावा व अर्जात नमूद केल्याप्रमाणे कागदपत्रांची पूर्तता करावी. यासंदर्भात इतर आवश्यक माहितीसाठी अमृत संस्थेच्या प्रत्येक जिल्ह्यातील जिल्हा अमृत कार्यालयाशी संपर्क साधावा.

**निवड प्रक्रिया -** प्राप्त झालेल्या अर्जांमधून निकषांच्या आधारे अर्जांची छाननी करण्यात येईल. निवडक उमेदवारांना पात्रता प्रवेश परीक्षा व मुलाखतीसाठी बोलावले जाईल. पात्र उमेदवारांची यादी संकेतस्थळावर उपलब्ध होईल. त्यानंतर प्रशिक्षणासाठी निवड झालेल्या उमेदवारांची यादी आय.जी.टी.आर. व अमृतच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

**कोणकोणते अभ्यासक्रम उपलब्ध आहेत? -** या अंतर्गत अनेक महत्त्वपूर्ण अत्याधुनिक अभ्यासक्रम आहेत: सीएनसी मशीन ऑपरेटर, मशिनिंग तंत्रज्ञान, उत्पादन व गुणवत्ता नियंत्रण, औद्योगिक देखभाल कौशल्ये, संगणक आधारित तांत्रिक प्रशिक्षण आणि उद्योग क्षेत्राला आवश्यक असणारे इतर कौशल्याधारित अभ्यासक्रम.

**प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर प्रमाणपत्र -** प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांना अधिकृत प्रमाणपत्र (णूर्ग्मूि) दिले जाते. हे प्रमाणपत्र शासकीय पार्श्वभूमी असलेल्या 'अमृत' संस्थेचे असल्याने खाजगी आणि निमशासकीय कंपन्यांमध्ये नोकरीसाठी अर्ज करताना याला प्राधान्य मिळू शकते. तसेच, स्वतःचा उद्योग सुरू करण्यासाठी किंवा कर्ज मंजुरीसाठी हे कौशल्य प्रमाणपत्र अत्यंत उपयुक्त ठरू शकते.

**स्वयंरोजगारासाठी संधी -** स्वतःचा उद्योग सुरू करू इच्छिणाऱ्या उमेदवारांसाठी अमृत संस्थेची वैयक्तिक व्याज परतावा योजना ही योजना उपलब्ध असणार आहे. याचा लाभ घेऊन हा उमेदवार स्वतःचा स्वतंत्र व्यवसाय देखील सुरू करू शकेल. यासाठी आवश्यक ते मार्गदर्शन घ्उऊं संस्थेकडून उपलब्ध होऊ शकेल.

**खुल्या वर्गातील अमृत च्या लक्षित गटातील उमेदवारांसाठी योजना -** ही योजना विशेषतः खुल्या वर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील (ईडब्ल्यूएस) अमृतच्या लक्षीत गटातील युवक-युवतींसाठी उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. आर्थिक अडचणीमुळे प्रशिक्षण घेऊ न शकलेल्या तरुणांना याचा लाभ होणार आहे. त्यामुळे या उमेदवारांनी सदर सुवर्णसंधीचा अतिशय चांगल्या पद्धतीने फायदा करून घ्यावा असे आवाहन 'अमृत' तर्फे करण्यात आले आहे.

**प्रशिक्षणानंतर नोकरी, व्यवसायासाठी साहाय्य -** प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण करणाऱ्या उमेदवारांना विविध नामांकित कंपन्यांमध्ये रोजगाराच्या संधी घ्उऊं मार्फत उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. स्वयंरोजगार किंवा उद्योग सुरू करू इच्छिणाऱ्या तरुणांना तांत्रिक मार्गदर्शन, प्रकल्प अहवाल आणि विविध शासकीय योजनांची माहिती दिली जाणार आहे.

अधिक माहितीसाठी खालील लिंकवर क्लिक करावे. त्याचप्रमाणे अमृतच्या जिल्हा कार्यालयाशी संपर्क साधावा.

**इतर माहितीसाठी संपर्क** या योजनेबाबत अधिक माहितीसाठी उमेदवारांनी आपल्या जिल्ह्यातील अमृत कार्यालयाला भेट देऊन जिल्हा व्यवस्थापकांशी संपर्क साधावा. संपर्क पत्ता:- विभागीय व जिल्हा कार्यालय अमृत, पुंडलिक नगर रोड, सेक्टर -४ सिडको, हनुमान नगर पाण्याच्या टाकीजवळ, छत्रपती संभाजीनगर .पि को :४३१००९संपर्क:- ७३९१०६५४७५ / ९४०३२००६०६ https://mahaamrut.org.in/coordinators-contact

# छत्रपती संभाजीनगरातील स्मार्ट सिटी रुग्णालयासाठी महानगरपालिकेमार्फत १० कोटी रुपये देण्यात येणार-मंत्री उदय सामंत

मुंबइ दि.२३ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर येथील स्मार्ट सिटी अंतर्गत उभारण्यात आलेल्या रुग्णालयाच्या कार्यान्वयनासाठी आवश्यक निधी तातडीने उपलब्ध करून देण्याबाबत राज्य शासन सकारात्मक असून महानगरपालिकेला १० कोटी रुपये उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले जातील, अशी माहिती मंत्री उदय सामंत यांनी विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली.

सदस्य विक्रम काळे यांनी याबाबत प्रश्न उपस्थित केला होता. तर सदस्य अनिल परब, अंबादास दानवे, चित्रा वाघ यांनी उपप्रश्न उपस्थित केले होते. त्यास उत्तर देताना सामंत बोलत होते.

मंत्री सामंत म्हणाले की, छत्रपती संभाजीनगर स्मार्ट सिटी प्रकल्पासाठी केंद्र शासन, राज्य शासन आणि महानगरपालिका यांच्या संयुक्त सहभागातून सुमारे ९०० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. त्यातून अत्याधुनिक रुग्णालयाची उभारणी करण्यात आली आहे. रुग्णालयातील वैद्यकीय उपकरणे, मनुष्यबळाची नेमणूक; तसेच अन्य आवश्यक कामांसाठी १० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्याबाबत राज्य शासनाकडून आजच महानगरपालिकेला निर्देश दिले जातील. छत्रपती संभाजीनगरमधील हे स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत उभारण्यात आलेले महत्त्वाचे आरोग्य केंद्र असून नागरिकांना दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध व्हावी, यासाठी शासन आवश्यक ती सर्व कार्यवाही करेल.


महावितरण — ई-निविदा सूचना

निम्नस्वाक्षरीकारांकडून पुढील कामासाठी अनुभवी व नोंदणीकृत ठेकेदारांकडून ई निविदा मागवण्यात येत आहे. R-1.R-2,Paithan, Bidkin उपविभागाअंतर्गत PC-0 च्या ग्राहकांचे मीटर रिडिंग घेणे या कामाकरिता निविदा क्र 1) EE/CSNRDN-I/TS/T-13/2026-27 2) EE/CSNRDN-I/TS/T-14/2026-27 3) EE / CSNRDN-I/TS/T-15/2026-27 4) EE/CSNRDN-I/TS/T-16/2026-27 या नावाने निविदा मागविण्यात येत आहे. विक्री कालावधी दि. २४.०६.२०२६ ते ३०.०६.२०२६. निविदा भरण्याची शेवटची तारीख दि ३०.०६.२०२६ रोजी १७.३० वाजेपर्यंत. वरील निविदा कंपनीच्या https://etender.mahadiscom.in/ या संकेतस्थळावर उपलब्ध आहे....

पीआरओ क्र.७३ Sd/-

Executive Engineer Rural Division-I, Chh.Sambhajinagar

महावितरण — निविदा सूचना

मा. कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि.कंपनी मर्या. विभागीय कार्यालय ग्रामीण विभाग २ यांच्या कार्यालयाकडून निविदा नं. EE/RDN-2/TS/T-05, 07, 08/ 2026-27 ग्रामीण विभाग २ विभागा अंतर्गत अनुक्रमे वाळूज, फुलंब्री व गंगापूर या उपविभागांकरीता पी. सी.० मधील वीज ग्राहकांची दर महिन्यात CMRI दवारे व MR-९ द्वारे मीटर रीडिंग घेणे वीज बिल छपाई व वीज बिले ग्राहकांना वाटप करणे या कामाकरिता नामनिर्देशित करण्याकरिता निविदा प्रसिद्ध करीत आहोत. त्या करिता निविदा विक्री कालावधी दि.२४.०६ २०२६. ते ३०.०६. २०२६ असा आहे निविदा भरण्याची शेवटची तारीख दि ३०.०६.२०२६, वेळ: सायंकाळी ५ वाजेपर्यंत महावितरण कंपनीच्या ) संकेतस्थळावर (www.mahadiscom.in) उपलब्ध आहे.

कार्यकारी अभियंता,
महावितरण, ग्रामीण विभाग २.

PRO NO : 69

## ई-निविदा प्रथम सुचना प्रसारण

दिनांक २३/०६/२०२६ पासुन लेखाशिर्ष **जिल्हा परिषद उपकर २७०२ लहान पाटबंधारे को.प.बं./पा.त.सि.ना.बां./गा.त./सि.त. दुरुस्ती (२७०२-१०१-२७)** या **लेखाशिर्ष अंतर्गत** को.प.बं. दुरुस्ती बोरसर ता. वैजापुर या कामांची ई-निविदा प्रसारीत करण्यात येत आहे. सदरचे कामाचे प्रथम प्रसारण १२ दिवस असून इतक्या कालावधीसाठी प्रसिध्द करण्यात येत आहे. सर्व निविदा अटी व शर्ती http://mahatendars.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. तरी सर्व निविदा धारकांनी यांची नोंद घ्यावी.

**स्वाक्षरीत/-**
**कार्यकारी अभियंता**
**जिल्हा परिषद (ल.पा.) विभाग,**
**छ. संभाजीनगर**

**स्वाक्षरीत/-**
**अति. मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, छ.संभाजीनगर**